पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, नोव्हेंबर २०२५, खंड २४, अंक ८, पृष्ठे ६०

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ■ संविधान
५ ■ चिकित्सक प्रजा आणि प्रजासत्ताक
१२ ■ प्रौढावस्थेतील नैराश्याची मुळे बालपणात...?
१५ ■ एकटा (टे) जीव सदाशिव!
२२ ■ जगाचे फुफ्फुस धोक्यात
२६ ■ घटता एकूण जननदर काय सूचित करतो?
३४ ■ दुर्मिळ बगळ्यांच्या रक्षणाचे आव्हान
३९ ■ उधारीचा दिवा आणि कर्जांचा राक्षस

**उजळणी**

४६ ■ (१) घटनात्मक नीतीचे काटेकोर पालन करा
(२) राजकीय पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/– रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. **त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.
वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : ०२०-२५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेल : ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २४ (अंक ८)**
**नोव्हेंबर २०२५**
**संपादक – अभय टिळक**
**सहयोगी संपादक – पराग पोतदार**

- **अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?**
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

**अर्थबोधपत्रिकेचा हेतू**

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी अनेक माहिती संदर्भासह पुरविणे.**

***अर्थबोधपत्रिका कशी साकारते?***

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याल अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि / किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# संविधान

राज्यघटनेचा स्वीकार करून आपल्याला ७५ वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्यानंतरच्या या पाऊण शतकी वाटचालीदरम्यान संविधानिक नीतीमत्ता (कॉन्स्टिट्यूशनल मोरॅलिटी) आपल्यात कितपत रुजली हा जसा अभ्यासाचा विषय बनतो तसाच व तितकाच तो मुद्दा विवाद्यही ठरावा. 'प्रत्यक्ष घटनेपेक्षा घटनेप्रमाणे वागण्याची नीती जनतेत असणे या गोष्टीला फार महत्त्व आहे,' अशी अतिशय मार्मिक निरीक्षणवजा टिप्पणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्रिवेंद्रम येथे सरकारी अधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांना संबोधित करतेवेळी १० जून १९५० या दिवशी केली होती. भारतीय राज्यघटनेचा अंमल त्यापूर्वी सहा महिने, म्हणजे, २६ जानेवारी १९५० या दिवशी व्यवहारात सुरू झालेला होता, ही बाब या संदर्भात लक्षणीय ठरते. संविधानाशी बांधिलकी जपण्याबाबतची लपफेदार भाषणे सर्वत्र सतत झडत असतात. परंतु, घटनेतील तरतुदींचे प्रत्यक्ष दैनंदिन जीवनात काटेकोरपणे पालन आपल्याकडून घडते का, या प्रश्नाचा, अगदी निर्ममपणे विचार केला तर, हाती येणारे उत्तर बहुश: नकारार्थीच शाबीत होते. संविधानिक नीतीमत्ता सांभाळली जाण्यासंदर्भातील आपला आग्रह व्यक्त करत असतानाच, त्याच भाषणादरम्यान, संसदीय लोकशाहीप्रधान राजवट देशामध्ये यशस्वीपणे नांदण्यासाठी अनिवार्य ठरणारे काही संकेत व आचरणपद्धती यांचाही उच्चार बाबासाहेबांनी तिथे केला. शासनसंस्थेने जनमताचा आदर सर्वतोपरी राखणे, ही, या संदर्भातील शासनसंस्थेची जबाबदारी ठरते, असे बाबासाहेब तिथे म्हणतात. तर, स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता व सवय जोपासणे, ही, त्या संदर्भात सर्वसामान्यांची जबाबदारी ठरते, असेही बाबासाहेब पुढे बजावतात. या दोन्ही आघाड्यांवर, संविधानाचा स्वीकार होऊन आज ७५ वर्षे उलटून गेली तरी, आपल्या देशातील चित्र अजिबातच समाधानकारक नाही, हे कोणीही मान्य करेल. संसदीय लोकशाही राज्यप्रणाली व्यवहारात अर्थपूर्ण रीतीने

नांदावी यासाठी अत्यावश्यक ठरणाऱ्या या व अशा अन्य काही आनुषंगिक संकेतांची व शिस्तीची पायमल्ली अथवा उपेक्षा होत राहिली तर, प्रत्यक्षात लोकशाहीचा प्राणहीन सांगाडा शिल्लक राहून हुकुमशाही प्रवृत्तींना हातपाय पसरण्यास अवकाश मिळेल, असेही बाबासाहेब सूचित करतात. संविधान सभेच्या २५ नोव्हेंबर १९४९ या दिवशी भरलेल्या अंतिम सभेत सगळ्यांत शेवटी बाबासाहेबांनी जे विचारप्रदर्शन तिथे मांडले त्याचा संपादित अंश, म्हणूनच, या अंकातील 'उजळणी' विभागात आवर्जून सादर केलेला आहे. आपल्या सगळ्यांच्याच डोळ्यांत त्यांद्वारे पुरेसे अंजन पडावे. संविधानाच्या चौकटीत जगत असतानाही काही अनुचित गोष्टी घडल्या तर त्याला संविधान नव्हे तर, संबंधितांचा दुष्टावा कारणभूत ठरेल, या आशयाचे बाबासाहेबांनी अन्यत्र काढलेले उद्गारही आज संदर्भहीन बनलेले नाहीत.

लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये वेळपरत्वे घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांदरम्यान मतदान केले की आपले प्रजासत्ताकासंदर्भातील कर्तव्य पार पडले, असा सोयीचा परंतु विलक्षण संकुचित अर्थ आपल्या समाजातील सुबुद्ध ***(कृपया पान ३३ पहावे)***

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# राजकीय

## चिकित्सक प्रजा आणि प्रजासत्ताक

'घटना'कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूरपासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या इंदोरा या गावी १० मे १९३८ रोजी एका सभेमध्ये केलेल्या भाषणाचा गोषवारा, 'जनता' साप्ताहिकाच्या १४ मे १९३८ व २१ मे १९३८ रोजीच्या अंकांत प्रसिद्ध झाला. १९३७ साली घेण्यात आलेल्या प्रांतिक सरकारांच्या निवडणुकीचा संदर्भ, बाबासाहेबांनी त्या सभेमधील भाषणादरम्यान केलेल्या उद्‌बोधनाला असला पाहिजे. बाबासाहेबांनी त्या वेळी केलेले विवेचन त्यांच्या लेखनाचे व भाषणाचे जे खंड महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेले आहेत त्यांत उद्‌धृत केलेले आहे.

विवेचनादरम्यान, बाबासाहेबांनी, 'मतदार' या नात्याने निवडणुकांदरम्यान एकदा मतदान केल्यानंतर सर्वसामान्यांची लोकशाहीप्रतीची जबाबदारी संपत नसते, या एका मूलभूत मार्गदर्शक तत्त्वाची जाणीव उपस्थितांना ज्या शब्दांत करून दिली ते शब्द आजही कालबाह्य झालेले नाहीत. प्रातिनिधिक लोकशाहीचे प्रारूप आपण स्वीकारलेले असल्याने, निवडून दिलेल्या आपल्या प्रतिनिधींच्या कामगिरीवर लक्ष ठेवणे हे आपलेच आद्य कर्तव्य होय, हे तत्त्व अधोरेखित करताना बाबासाहेब म्हणतात – ''तुम्ही निवडणुकीच्या वेळी निवडून दिलेली माणसे आपल्या हिताचे कार्य करतात किंवा नाही, हे पाहणे तुमचे कर्तव्य होय. त्यांच्या कामावर पाळत ठेवणे, कौन्सिलमध्ये जे कार्य होते त्यात आपल्या हिताचे प्रश्न, ठराव वगैरे मांडतात किंवा नाही, हे पाहणे तुमचे कर्तव्य होय. प्रत्येक सेशनच्या शेवटी या लोकांनी केलेल्या कामगिरीचा जाब आज भरविलेल्या सभेप्रमाणे सभा बोलावून त्या सभेत त्यांना विचारू शकता. जे तुमच्या हिताचे कार्य करीत नाहीत त्यांच्याविरुद्ध ते ज्या कॉन्स्टिट्यूअन्सीमधून निवडून आले असतील त्या कॉन्स्टिट्यूअन्सीमध्ये त्यांच्याविरुद्ध प्रचार करणे हे तुमचे कर्तव्य होय. जसे निवडून देणे हे तुमचे कर्तव्य आहे तसेच

त्यांच्या कार्यावर नजर ठेवणे हे तुमचे आद्य कर्तव्य होय. यांच्यावर अशा रीतीने पाळत ठेवल्याने ते भीतीने तरी कौन्सिलमध्ये कार्य करतील. अशा रीतीने तुमचे कार्य चालल्यास तुमच्या हिताचे बरेच कार्य होईल...'' बाबासाहेबांनी जवळपास नऊ दशकांपूर्वी केलेल्या या विवेचनाची प्रस्तुतता चिरंतन अशीच आहे. थेट उच्चार केलेला नसला तरी, कोणतीही प्रजासत्ताक राज्यपद्धती अर्थपूर्ण बनण्यासाठी मतदात्या नागरिकांनी आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या कामकाजावर चिकित्सक नजरेने बारीक लक्ष ठेवणे बाबासाहेबांना अपेक्षित आहे, ही बाब त्यांच्या त्या विवेचनाद्वारे स्पष्टपणे ध्वनित होते.

'लोकशाहा'नामक व्यवस्थेची व्याख्या आपल्या सगळ्यांना तोंडपाठ आहे. इतकी की, 'लोकांचे, लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही', हे वाक्य मध्यरात्री गाढ झोपेतून जागे केले तरी सगळेजण घडघडा म्हणून दाखवतील! पण त्याच वेळी, कोणत्याही प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेचा प्राण असणारे 'लोक' हे समूहवाचक 'तत्त्व' नेमके कसे असले पाहिजे आणि ते कसे असणे अपेक्षित आहे यांबद्दल मात्र आपल्यापैकी बहुतेक सगळेच गाढ झोपेत असतात. प्लेटोसारख्या विचारवंताला लोकशाही राज्यव्यवस्थेबद्दल त्यांमुळेच प्रगाढ साशंकता वाटत राहिली. आपल्या कल्याणासाठी उपकारक ठरेल असा कारभार करण्याइतपत समाजातील प्रत्येक व्यक्ती प्रगल्भ, विचारी व विचक्षण असेलच याची खात्री वाटत नसल्यामुळेच प्लेटो प्रजासत्ताक व्यवस्थेबाबत सचिंत व साशंक राहिले. त्यांवर, एका परीने, उपाय म्हणून अथवा पर्याय म्हणून प्रातिनिधिक लोकशाहीचे 'मॉडेल' अस्तित्त्वात आणले गेले आणि त्याला व्यापक स्वीकृतीदेखील लाभली. जनकल्याणाची व्यापक दृष्टी व जाणीव असलेल्या प्रतिनिधींच्या हाती प्रजासत्ताकाची सत्तासूत्रे सोपविणे हा, त्यांतल्या त्यांत,सावध व सुरक्षित मध्यममार्ग मग आपण स्वीकारला. परंतु, तरीही एक प्रश्न उरतोच. आणि तो म्हणजे, आपण निवडून दिलेले आपले प्रतिनिधी आपल्याच हिताचे प्रश्न प्रतिनिधी सभागृहात मांडून त्यांच्या सोडवणुकीसाठी उचित अशी धोरणे आखत व राबवत आहेत किंवा नाही, हे कोणी बघायचे, हा तो प्रश्न.

आपण निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या कामकाजावर बारीक लक्ष ठेवायचे तर लोकदेखील तितकेच जागरूक व दक्ष हवेत. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, समाजपुरुषाची Critical Thinking करण्याची क्षमता त्यासाठी चांगल्यापैकी सुदृढ असावयास हवी. इथे 'क्रिटिकल' ही संज्ञा 'छिद्रान्वेषी' अथवा 'दोषदर्शी' अशा एकारल्या अर्थानेच वापरली जाणे अजिबात अपेक्षित नाही. प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा

आत्मा जर शाबूत राहायला हवा असेल तर, प्रत्येक नागरिक चिकित्सक बुद्धीचा असावा, तारतम्याने विचार करण्याची त्याला आवड, सवड आणि सवय असावी, त्याची समीक्षावृत्ती सक्षम असावी ही इथे अपेक्षा आहे. सत्ताधारी पक्षाच्या राज्यकारभारातील केवळ चुकाच तेवढ्या कावळ्याच्या नजरेने हेरून त्यांबाबत टीका करत बसण्याला 'क्रिटिकल थिंकिंग' म्हणत नाहीत. तर, भवतालातील घटनांबाबत साधकबाधक विचार करणे, सर्जनशील राहणे, बदलत्या पर्यावरणाशी सुसंवादी ठरतील असे बदल स्वत:मध्ये घडवून आणणे, योग्य असे प्रश्न उपस्थित करण्याची दक्षता जपणे, पुढ्यात आलेल्या माहितीचे तारतम्याने विश्लेषण करणे, व्यवस्थेमार्फत पुरविला गेलेला तपशील यथार्थ आहे अथवा नाही याची शहानिशा करण्याची शिस्त अंगी बाणवणे आणि एकंदरीनेच परिस्थितीचे प्रगल्भ मूल्यमापन करण्याची सवय लावून घेणे या सगळ्या बाबींचा अंतर्भाव 'क्रिटिकल थिंकिंग' या संकल्पनेत होतो आणि केला जातो.

वेगवेगळ्या स्तरांवरील निर्णयप्रक्रियेमध्ये लोकांचा सहभाग लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये अपेक्षित आहे आणि अध्याहृतही. तो लोकसहभाग अर्थपूर्ण ठरावा यासाठी सर्वसामान्य माणूस चिकित्सक विचार करतो अथवा नाही, ही बाब कळीची ठरते. लोकशाही राज्यव्यवस्थेतील धोरणनिर्मिती चर्चा-संवादाच्या माध्यमातून घडत राहते. असा संवाद हा अनेक वृत्ती-प्रवृत्तींच्या समूहांदरम्यान झडत राहतो. प्रत्येक समूह स्वरूपत:च भिन्न असतो. साहजिकच, असे संवाद बहुपदरी असतात. नाना प्रकारची मतमतांतरे मांडली जातात. वाद-प्रतिवाद झडतात. नाना प्रकारचे दाखले दिले जातात. चर्चाविषयाच्या विविध बाजू पुढ्यात सादर होत राहतात. अशा वेळी, प्रसंगी, विरोधी व न पटणारे युक्तिवाद सजगपणे व तितिक्षेने जाणून घेऊन आपले मत व्यक्त करण्याला चिकित्सक विचारशक्तीची गरज असते. म्हणजेच, कोणतीही लोकशाही राज्यव्यवस्था निरामय ठरायची असेल तर नागरिकांची समीक्षादृष्टी आणि चिकित्सक बुद्धी सतत पाजळलेली असणे अगत्याचे ठरते. त्यांतच, आज 'सोशल मीडिया'चा झालेला आणि होत असलेला अप्रतिहत प्रसार व संचार, व्यवस्थेतील नानाविध हितसंबंधी घटकांकडून केले जाणारे दावे, दिशाभूल करू शकणारे छद्म पुरावे यांचा चहूंकडून भडिमार होत असल्याने आपले तारतम्य अष्टौप्रहर दक्ष राखणे हे पूर्वीपेक्षाही आज अधिक गरजेचे बनलेले आहे.

खुल्या बाजारपेठीय अर्थकारणाच्या गतीविधींनुसार साकारणारा आर्थिक विकास आणि लोकशाही राज्यपद्धती यांचा अन्योन्य संबंध अनेक अभ्यासांती आता सिद्ध

झालेला आहे. मुक्त बाजारपेठेमध्ये वस्तूंच्या किमती मागणी आणि पुरवठ्याच्या परस्परसापेक्ष समीकरणांनुसार निर्धारित होत राहतात. आपल्या आवडीच्या जिनसा खरेदी करण्याचे स्वातंत्र्य ग्राहकाला त्या व्यवस्थेत पुरेपूर असते. एकंदर मागणी आणि पुरवठ्याच्या प्रवाहानुसार बाजारपेठेत निश्चित होणाऱ्या किमती अदा करून आपल्याला पाहिजे ती वस्तू पारखून घेण्याची स्वायत्तता खुली बाजारपेठ ग्राहकवर्गाला बहाल करत असते. म्हणजेच, आपले निवडस्वातंत्र्य व्यक्त करण्याचा आवश्यक तो अवकाश खुली बाजारपेठ ग्राहकांना उपलब्ध करून देत राहते. लोकशाही राज्यव्यवस्थेमध्येदेखील आपापले मत प्रगट करण्याचा मुक्त अवकाश प्रत्येक नागरिकाला असतो. किंबहुना, प्रजासत्ताक राजवटीमध्ये तेच अपेक्षित आहे. हे स्वातंत्र्य प्रत्येक नागरिक किती जागरूकपणे उपभोगतो हा खरा मुख्य प्रश्न होय. लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये अपेक्षित आणि अध्याहृत असलेला मुक्त संवाद, तो संवाद अर्थपूर्ण व्हावा यासाठी निकडीची असणारी चिकित्सक विचारक्षमता आणि तशी विचारक्षमता समाजपुरुषामध्ये निर्माण व्हावी या दृष्टीने आवश्यक तो अवकाश उपलब्ध करून देणाऱ्या लोकशाहीतील संस्थात्मक रचना या तीन घटकांमधील वीण आज जगभरात सर्वत्रच वेगाने उसवली जाताना दिसते आहे. राजकीय व्यवस्थेमध्ये सक्रिय असलेल्या राजकीय पक्षांची विलक्षण एकारलेली विचारसरणी, मुक्त संवादाचा संकोच करणारी पक्षीय व्यवस्था, दिशाभूल करणारी कथने आक्रमकपणे सादर करत सर्वसामान्यांचा मतिभ्रंश करणारी राजकीय धुरिणांची कार्यपद्धती, धार्मिक-वांशिक-भाषिक-प्रादेशिक अशा नाना प्रकारच्या संवेदना तीव्र बनवत समाजात टोकाचे ध्रुवीकरण घडवून आणण्याची घातक प्रवृत्ती अशांसारख्या, चिकित्सक विचारक्षमतेच्या मुळावर उठणाऱ्या, वृत्ती-प्रवृत्ती वेगाने सर्वत्र बळजोर बनत आहेत.

लोकसमूहांच्या कल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या अनेकविध विकासयोजनांच्या आराखडानिश्चितीमध्ये आणि त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीदरम्यान, ज्यांच्यासाठी त्या योजना हाती घेतल्या गेलेल्या आहेत त्या जनसमूहांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष सहभाग असावा, ही धारणा 'सहभागात्मक विकास' (पार्टिसिपेटरी डेव्हलपमेन्ट) या संकल्पनेच्या मुळाशी आहे. वर्तमानातील भवतालाचा साक्षेपपूर्वक विचार करून त्यांतील वैगुण्यांचे उच्चाटन घडवून आणण्यासाठी नागरिकांच्या ठायी चिकित्सक दृष्टी निर्माण होणे अगत्याचे ठरते. शासनसंस्थेचा शकट चालविण्यासाठी 'सरकार'नामक यंत्रणा निवडणुकीच्या माध्यमातून निर्माण करणे हे प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्थेमध्ये नागरिकांच्या हातात राहते. परंतु, निवडून दिलेले प्रतिनिधी लोककल्याणाच्या नेमक्या

कोणत्या योजना अथवा उपक्रम प्रवर्तित करतील त्यांवर मतदात्यांचे काहीच नियंत्रण अथवा निगराणी राहू शकत नाही. अशा परिस्थितीत, समकालीन राजकीय–सामाजिक–आर्थिक प्रश्न, त्यांतील व्यामिश्रता आणि त्यांच्या निराकरणासाठी सरकार राबवित असलेले कार्यक्रम यांची प्रस्तुतता चिकित्सक जिज्ञासेने जोखण्यासाठी वर्तमानाबाबतचे जबाबदार भान नागरिकांमध्ये जागृत असणे अत्यावश्यक ठरते. परंतु, लोकमानस वर्तमानासंदर्भात सजग बनवण्याऐवजी, सुदूर भूतकाळात गडप झालेल्या कथित घटना–प्रसंगांचे उदात्तीकरण घडवून आणत समाजमन गतकालीन स्मृतींमध्येच गुरफटलेले राहील असाच वैचारिक अवकाश प्रस्थापित करण्याचा परिपाठ, धोरणकर्तेच ज्या वेळी हिरिरीने अंगीकारावयास लागतात, तेव्हा परिस्थिती अधिकच शोचनीय बनते. मतामतांतील विविधता मान्य करण्याचा उदारभाव, विरोधी मत ऐकून घेण्याइतपतची वैचारिक सहिष्णुता, भिन्न, प्रसंगी आपल्या विचारसरणीशी अगदी विसंगत, भूमिका समजावून घेण्याचा प्रयत्न करण्याचा वैचारिक खुलेपणा या, प्रजासत्ताक राज्यव्यवस्था निकोपपणे कार्यरत राहण्यासाठीच्या पायाभूत शर्ती ठरतात. चिकित्सक विचारक्षमता हे या शर्ती व्यवहारात उतरण्यासाठी आवश्यक असलेले मूलद्रव्य ठरते.

चिकित्सक विचारक्षमतेचा मुद्दा उपस्थित होतो तो नेमका इथेच. या ठिकाणी दोन गोष्टींचा विचार क्रमप्राप्त ठरतो. एक म्हणजे, आपल्या परिस्थितीसंदर्भात सारासार चिकित्सा करण्याची क्षमता नागरिकांच्या ठायी निर्माण झालेली आहे अथवा नाही, हा झाला त्यांतील पहिला प्रश्न. तर, चिकित्सक विचार करण्यासाठी अनुकूल असणारे वातावरण राजकीय व्यवस्था नागरिकांना उपलब्ध करून देते अथवा नाही, हा झाला दुसरा प्रश्न. खरे म्हणजे, एका परीने, या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत. म्हणजेच, नागरिकांच्या ठायीची चिकित्सक विचारक्षमता आणि लोकशाही राज्यप्रणाली या दोन बाबी परस्पराश्रयी होत. साहजिकच, त्यांचे भरणपोषण परस्परांवर अवलंबून राहते. आता, चिकित्सक विचार करण्याची क्षमता समाजात निर्माण करता येते का, असा प्रश्न कोणी विचारेल. त्या दृष्टीने आज ठिकठिकाणी चिंतनमंथन चालू आहे. किंबहुना, शिक्षणप्रणालीमध्येच त्या दृष्टीने कोणत्या पद्धती अथवा कोणत्या अभ्यासघटकांचा समावेश करता येईल (अथवा, समावेश असावा) या दिशेने अनेक पातळ्यांवर आज विचारविमर्श अंग धरतो आहे.

चिकित्सक व चौफेर असा साधकबाधक विचार करण्याची क्षमता शिक्षण–व्यवस्थेसारख्या संस्थात्मक रचनेद्वारे समाजव्यवहारात निर्माण करता येईल किंवा

कसे, हा खरोखरच अवघड आणि सूक्ष्म प्रश्न आहे. त्यासाठी संस्थात्मक पातळीवरून विचार आणि प्रत्यक्ष कृती करण्यासाठी प्रयत्नशील बनत असतानाच, व्यक्तिगत पातळीवरदेखील त्यासाठी स्वत:ला सक्षम बनविण्याच्या दिशेने नागरिकांनी प्रयास करणे गरजेचे आहे, असे मत काही अभ्यासक मांडताना दिसतात. स्व-मताबद्दलची नि:शंकता आणि दृढ बांधिलकी, प्रसंगी प्रवाहाविरुद्ध पोहण्यासाठी आवश्यक असणारे धैर्य आणि चिकाटी, चटदिशी भावनावश होण्याऐवजी तर्काचा आसरा घेण्याची शिस्त... अशांसारख्या गुणांची जोपासना डोळसपणे करण्याबाबत प्रत्येकच नागरिकाने प्रवृत्त होणे अगत्याचे ठरते, ही बाब अभ्यासक आवर्जून मांडतात. त्यासाठी जी किंमत मोजावी लागते ती पेलण्याचे बळ संबंधितांना प्राप्त व्हावे यासाठी अनुरूप अशा सामाजिक व्यवस्था, आधार पुरविणाऱ्या संस्थात्मक रचना लोकप्रेरणांद्वारे समाजव्यवस्थेत निर्माण व्हाव्यात यासाठी सायास करणे गरजेचे ठरते. कारण, प्रस्थापित मतसरणीबाबत विरोधी भूमिका घेणाऱ्या व्यक्ती अगर संस्था, कसोटीच्या क्षणी, एकट्या पडतात. त्यांना बळ पुरविणाऱ्या व्यवस्था समाजव्यवहारात जितक्या अधिक प्रमाणावर सक्रिय बनतील तितक्या अधिक प्रमाणात चिकित्सक विचारक्षमतेचे संगोपन-संवर्धन व्यापक स्तरावर घडत राहील, असे अभ्यासकांचे प्रतिपादन होय.


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**
**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

केवळ निवडणुकांचे आन्हिक वेळापत्रकानुसार पार पाडणे म्हणजे लोकशाही राज्यव्यवस्था नव्हे. तर, मतपेटीद्वारे निवडून दिलेले आपले प्रतिनिधी, नागरिकांच्या तात्कालिक तसेच दीर्घकालीक कल्याणाचे जतन करणारी धोरणप्रणाली राबवितात अथवा नाही, हे दक्षपणे निरखण्यासाठी चिकित्सक विचार करण्याची क्षमता प्रत्येक समाजघटकाच्या अंगी बाणावी यासाठी तशी संस्कृती वैचारिक अवकाशात साकार करण्यासाठी झटणे, हेदेखील प्रत्येकाचे एक मूलभूत कर्तव्य ठरते. प्रगल्भ व विचारक्षम समाजमन निर्माण व्हावे यासाठी समाजजीवनाच्या विविध पैलूसंदर्भात तटस्थ, वस्तुनिष्ठ, अद्ययावत व विश्वासार्ह तपशील, आकडेवारी संकलित करून तिच्या अभिनिवेशरहित विश्लेषणांती हाती येणारे निष्कर्ष नि:ष्पक्षपणे प्रगट करणाऱ्या संस्था समाजव्यवहरात कार्यरत राखणे, हे मग महत्त्वाचे ठरते.

शासनसंस्थेच्या माध्यमातून वितरित केली जाणारी अधिकृत आकडेवारी, पक्षीय व्यासपीठांवरून प्रसृत केली जाणारी विश्लेषणे, 'सोशल मीडिया'वरून सादर होणारे दावे, कोणत्या ना कोणत्या वैचारिक ध्रुवाशी बांधिलकी मानणाऱ्या विचारपीठांद्वारे पुढ्यात येणारी विकारी आणि प्रचारी विश्लेषणे... यांच्या गदारोळात गोंधळून जाणाऱ्या सर्वसामान्य विचारी नागरिकांना विश्लेषणाचा, माहितीचा एक त्रयस्थ स्रोत हाताशी असेल तरच पर्यायी विचारदिशेचे भान त्याच्या ठायी निर्माण होणे शक्य बनेल. उपलब्ध माहितीचा, तपशीलांचा, विश्लेषणांचा तारतम्यपूर्ण स्वीकार अगर अव्हेर करण्याच्या त्याच्या क्षमता बळकट बनविणारी संस्थात्मक व्यवस्था जपणे हे निरामय प्रजासत्ताकाच्या दृष्टीने अग्रक्रमाचे ठरते. कारण, आपण निवडून दिलेले आपले प्रतिनिधी उचित कार्य करत आहेत अथवा नाही हे डोळे उघडे ठेवून बघणे आणि त्यांच्या कामाकाजपद्धतीबाबत आवश्यक तेव्हा योग्य ते प्रश्न उपस्थित करून मतदारांप्रती असलेल्या त्यांच्या जबाबदारीची त्यांना रास्त जाणीव करून देणे, ही निकोप लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये नागरिकांकडून असलेली अपेक्षा त्यांखेरीज व्यवहारात उतरणार नाही. ती सैद्धान्तिक पातळीवरच राहील.

## सामाजिक

# प्रौढावस्थेतील नैराश्याची मुळे बालपणात...?

आपल्या बालपणी अनेक घटना आपल्या मनावर प्रभाव टाकीत असतात. त्या निरागस, कोवळ्या मनामध्ये अनेकदा, प्रसंगानुरुप मनावर झालेले आघात आपल्याही नकळत मोठा परिणाम घडवून गेलेले असतात. त्या वेळी त्यांचे परिणाम लक्षात येत नाहीत परंतु मोठेपणी मात्र त्या घटनांचे गंभीर असे शारीरिक, मानसिक परिणाम होताना दिसतात. त्याच्या मुळाशी जाणारे एक महत्त्वाचे असे संशोधन अलीकडेच Columbia University आणि McGill Universityतील मेंदूशास्त्रज्ञांनी केलेले आहे.

या नवीन संशोधनानुसार वैज्ञानिकांनी मेंदूतील असे नवे रसायन शोधले आहे की जे लहानपणी झालेले आघात आणि नंतर उद्भवणारे नैराश्य यांच्यामध्ये सखोल संबंध असतो, हे दर्शवते. बालपणीच्या आघातांमुळे ज्या गंभीर मानसिक व्याधी नंतरच्या काळात निर्माण होतात त्याच्या मुळाशी जाऊन त्यावर उपचार करणे या संशोधनामुळे आता आगामी काळात शक्य होणार आहे.

प्रत्येकाच्या बालपणीचे अनुभव वेगळे असतात. लहानपणी अशा काही घटना घडलेल्या असतात ज्यांचा परिणाम त्या वयात मनाच्या पातळीवर अगदी खोल झालेला असतो. बालवयात अनुभवलेले शारीरिक अत्याचार, मानसिक हिंसा किंवा कुटुंबातील अस्थिर वातावरण प्रौढ वयातील मानसिक आरोग्यावर खोलवर परिणाम करतात. त्या अजाण वयात सोसलेले आघात प्रौढपणी नैराश्य आणि आत्महत्येसारख्या नकारात्मक विचारांनी उचल खाण्याचा धोका वाढवतात. बालपणी विविध कारणांनी मनावर होणारे आघात खोल परिणाम घडवत असतात याची मानसशास्त्रज्ञांना पुरेपूर जाणीव व ज्ञान होते. परंतु, हे नवे संशोधन अभ्यासकांना आता या विषयाच्या मुळाशी घेऊन जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते आहे.

अमेरिकेतील या अभ्यासानुसार, नैराश्यग्रस्त असणाऱ्या प्रौढांपैकी सुमारे ६० टक्के लोक आणि अशाच नैराश्यातून जीवनाचा उबग आल्यामुळे आत्महत्येला प्रवृत्त होणाऱ्या लोकांपैकी दोन तृतीयांश व्यक्तींनी त्यांच्या बालपणात काही ना काही प्रतिकूल अनुभव घेतलेले असतात आणि त्याचा मोठा परिणाम त्यांच्या मनावर त्या काळात झालेला असतो. नैराश्य कमी करण्यासाठी जी औषधे सामान्यत: वापरली जातात त्यांचा इतर रुग्णांवर जितका सघन परिणाम घडून येतो तितका परिणाम बालपणात आघात अनुभवलेल्या लोकांमध्ये होताना दिसत नाही, असेही शास्त्रज्ञांना दिसून आले होते.

त्यावरून शास्त्रज्ञांच्या हे लक्षात आले की, बालपणी तणाव किंवा मनावरचे मोठे आघात सहन केलेल्या व्यक्तींच्या मनोविश्वात नैराश्य निर्माण करणाऱ्या जैविक प्रक्रिया सामान्य लोकांपेक्षा वेगळ्या असतात. अशा लोकांसाठी उपचारही वेगळ्या प्रकारचे करावे लागतील, हे देखील या संशोधनातून अधोरेखित झालेले आहे.

**मानसिक तणावापायी मेंदूच्या व्यवस्थेमध्ये** Serum and Celucocorticold - regulated Kinase - SGK1 या नावाचे प्रथिन निर्माण होते. बालपणी मनावर गंभीर आघात झालेल्या व्यक्तींमध्ये SGK1 चे प्रमाण इतरांच्या तुलनेत दुप्पट आढळले. प्रतिकूल परिस्थितीचा अजाण वयात सामना केलेल्या मुलांमध्ये SGK1 चे प्रमाण अधिक असल्यास त्यांच्या बाबतीत किशोरवयात नैराश्याचा धोका अधिक असल्याचेही अभ्यासातून समोर आले आहे. लहानपणी तणाव अनुभवलेल्या व्यक्तींमध्ये नैराश्य आणि आत्मघाती प्रवृत्तींनी उसळी घेण्यास पूरक ठरणारा महत्त्वाचा जैविक घटक म्हणून SGK1चा प्रभाव या संशोधनातून अधोरेखित झाला आहे. SGK1 हे प्रथिन अधिक प्रमाणात असलेल्या व्यक्तींमध्ये नैराश्याची तीव्रतासुद्धा अधिक असल्याचे दिसून आले. SGK1 वाढल्यामुळे मेंदूतील काही महत्त्वाच्या पेशींची ताणतणावाचा प्रतिकार करण्याची क्षमता कमी होते. भविष्यात नैराश्य वाढण्याची शक्यता त्यांमुळे अधिक निर्माण होते.

हे संशोधन मुख्यत: मृत व्यक्तींची माहिती आणि उंदरासारख्या प्राण्यांवर केलेल्या प्रयोगांतून जे कार्यकारणभाव समोर आले त्यावर आधारित आहे. माणसांवर या औषधांचा कसा आणि किती परिणाम होतो हे पुढील टप्प्यात अभ्यासले जाणार आहे. नैराश्य हे अनेकानेक कारणांपायी निर्माण होत असते त्यामुळे प्राथमिक अभ्यासांद्वारे हाती आलेल्या तथ्यांवरून थेट निष्कर्षापर्यंत पोहोचणे थोडे घाईचे ठरेल, असाही काही शास्त्रज्ञांचा सावधगिरीचा इशारा आहे.

**संभाव्य नवीन उपचार**

बालपणी आघात अनुभवलेल्या व्यक्तींवरील उपचारांसाठी SGK1 चे कार्य थांबवणारी औषधे (SGK1 inhibitors) प्रभावी ठरू शकतात. उंदरांवरील प्रयोगात, जेव्हा SGK1 inhibit रक्तप्रवाहात सोडले गेले, तेव्हा दीर्घकाळ टिकणाऱ्या तणावाच्या काळातही उंदरांमध्ये नैराश्यासारखी लक्षणे आढळून आली नाहीत. बालपणी प्रतिकूल अनुभव आल्याने पुढे नैराश्यग्रस्त बनलेल्यांवर भविष्यात चाचण्या सुरू होण्याची शक्यता या नव्या संशोधनामुळे निर्माण झाली आहे. तसेच, जनुकीय तपासणी करून अशा व्यक्तींची ओळख पटवता येईल.

हे संशोधन सध्या अगदी प्राथमिक अवस्थेत आणि पहिल्या टप्प्यावर असल्याने अद्याप त्याला 'मान्यताप्राप्त औषध' म्हणून अधिमान्यता मिळालेली नाही. तसेच त्याचे बहुतांश प्रयोग हे उंदरांवर व कोषिकांवरच झालेले असल्याने मानवी रुग्णांवरील उपचारांदरम्यान त्याचा परिणाम किती आणि कसा होतो हे अद्याप अभ्यासायचे आहे. बालपणातील आघातांचा परिणाम पुढे नैराश्यात परिणाम कसा होते हे आता समोर येत असले तरी आयुष्याच्या पुढील टप्प्यांवर कोसळणारे आघात आणि नैराश्य यांच्यादरम्यानच्या सहसंबंधांबाबत अधिक सखोल संशोधन होणे बाकी आहे. त्यामुळे SGK1 आधारित उपचार सर्वांसाठी कितपत उपयुक्त ठरू शकतील या विषयीदेखील अद्याप शास्त्रज्ञांच्या मनात साशंकता आहे. मनावरचे आघात, त्यांतून निपजणारे नैराश्य, त्याचे परिणाम, त्यातून निर्माण होणारे मनोविकार यांची जटिलता खूप मोठी आहे. त्यामुळे SGK1 हे त्यावरचे एकमेव उत्तर असू शकेल असे ठामपणाने म्हणता येत नाही. परंतु तूर्तास तरी या नव्या संशोधनामुळे आपण काही प्रश्नांच्या मुळाशी आता जाऊ शकतो हा दिलासादेखील मोठा आहे.

## सामाजिक

# एकटा (टे) जीव सदाशिव!

समाजव्यवस्थेत साकारणारे काही बदल असे असतात की, त्यांचे पडसाद सूक्ष्म असल्यामुळे त्यांचे बहुआयामी स्वरूप लगोलग स्पष्ट होत नाही. जगभरात सर्वत्रच सरासरीने घटत असलेला जननदर हा याच वर्गात मोडणारा बदल होय. जगाची लोकसंख्या आजघडीला जवळपास ८०० कोटींपेक्षा अधिक आहे. या शतकाच्या मध्यापर्यंत हा आकडा साधारणपणे १००० कोटींचा टप्पा गाठेल, असा अंदाज लोकसंख्याशास्त्राच्या अभ्यासप्रांतातील तज्ज्ञांची आकडेमोड सांगते. असे असले तरी, जगभरात सर्वत्रच सरासरी जननदर घटतो आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक तसेच सांस्कृतिक अशी विविध कारणे या प्रक्रियेच्या मुळाशी दिसतात. परंतु याच्या जोडीनेच, मुलांच्या संगोपनाचा वाढता खर्च आणि स्त्रियांच्या सामाजिक दर्जात एकंदरीनेच घडून आलेली वाढ, महिलांचा श्रमदलातील वाढता सहभाग आणि मुख्य म्हणजे उच्च शिक्षणाकडे स्त्रियांचा वाढता असलेला कल... हे घटकदेखील या बदलत्या प्रवाहाचे मुख्य शिल्पकार होत, असे अभ्यासकांचे निरीक्षण सांगते. वेगाने हातपाय पसरणारे शहरीकरण, तंत्रशास्त्राच्या प्रांतातील अप्रतिहत प्रगती, दरडोई उत्पन्नातील वाढ, त्यांमुळे आर्थिकदृष्ट्या स्वायत्त राहण्याकडे वाढणारा सर्वसाधारण कल, त्यांपायी लग्न लांबणीवर टाकण्याची प्रवृत्ती, रोजगार तसेच व्यवसायातील जीवघेणी स्पर्धा व परिणामी सघन होत चाललेली अनिश्चितता, कुटुंबनियोजनाला वाढती पसंती, लग्नानंतर अपत्यसंभव शक्य तितका लांबवण्याचा वाढता परिपाठ... अशा अन्य कारणांचाही हातभार घटत्या जननदराला लागतो आहे.

या सगळ्या अशा घटनाक्रमाचा आणखी एक परिपाक आताशा जगभरात सर्वत्रच – आणि त्यांतल्या त्यांत श्रीमंत व विकसित देशांमध्ये अधिकतर – प्रकर्षाने पृष्ठभागावर दिसण्यास प्रारंभ झालेला आहे आणि तो म्हणजे लग्नाच्या बंधनात न अडकता एकल जीवन व्यतीत करण्याचा! 'एकटा जीव सदाशिव' ही मराठी भाषेतील

एक जुनी म्हण आपल्या परिचयाची आहेच. परंतु, एकल जीवन व्यतीत करण्याची, पूर्वी तशी अभावानेच आढळून येणारी, प्रवृत्ती आताशा अनेकांची सहजवृत्ती होऊ लागलेली आहे किंवा कसे, असा प्रश्न समाजाभ्यासकांना पडू लागलेला आहे. एकेकट्याने जगत आयुष्य घालविण्याकडे वाढता दिसणारा हा कल उद्याच्या कोणत्या संभाव्य धोक्यांकडे निर्देश करतो, यांबाबतही समाजविज्ञानाच्या प्रांतातील संशोधक व विचारवंत आज सचिंत दिसतात. ही प्रवृत्ती अशीच बलवत्तर होत राहिली तर, वैश्विक स्तरावर, लोकसंख्येची वयानुसारी जडणघडण, कशा प्रकारे बदललेली दिसेल यांबाबतही आता वेगाने चिंतन–मनन घडते आहे. या दिशेने समाजाचा प्रवास असाच चालू राहिला तर कशा प्रकारच्या सामाजिक व आर्थिक समस्या निर्माण होऊ शकतात यांबाबतही अभ्यासकांमध्ये खल चालू आहे. परिणामी, सुदूर भविष्यात शासनसंस्थेच्या धोरणांचा भर व दिशा कशाप्रकारे प्रभावित होऊ शकते, हादेखील एक चर्चाविषय या प्रांतात घुमतो आहेच.

समाजाभ्यासकांचे ध्यान प्रकर्षाने वेधले जावे असाच हा बळजोर प्रवाह आहे. आजमितीस जरी, जगाच्या श्रीमंत पट्ट्यातील देशांमध्ये एकल जीवन जगण्याकडे वाढणारा कल लक्षणीय दिसत असला तरी, उद्या विकसनशील देशांमध्येदेखील त्याचे लोण पसरणार नाहीत, असे कोणीही छातीठोकपणे आज सांगू शकत नाही. परिणामी, आज नाही तर उद्या, शक्यतो कोणत्याही नातेसंबंधांच्या गुंत्यात पाय न अडकवता स्वत:ला भावेल तसा व तो जीवनक्रम मन:पूत आचरण्याकडे समाजमनाचा कल सार्वत्रिकरीत्या झुकला तर येणाऱ्या भविष्यातील समाजरचना व समाजव्यवस्था नेमकी कशी असेल या चिंतेचा आणि चिंतनीय विषय बनतो आहे. या जीवनराहाटीपायी कोणत्या प्रकारच्या भावनिक, शारीरिक, मानसिक समस्या व ताणतणाव उद्याच्या समाजव्यवहारात संभवतील याचाही काहीएक वेध आता समाजाभ्यासक जगभरात घेताना दिसतात. श्रीमंत गणल्या जाणाऱ्या जगभरातील ३० देशांपैकी तब्बल २६ देशांमध्ये एकल जीवन जगणाऱ्या स्त्री–पुरुषांचे सरासरी प्रमाण २०१० सालानंतर सातत्याने वाढते राहिल्याचे वास्तव संबंधित आकडेवारी आपल्या पुढ्यात मांडते आहे.

तसे पाहिला गेले तर, हा कल त्या मानाने अलीकडचा म्हणावा लागेल. एकेकटे जीवन जगणाऱ्यांचे, आणि पर्यायाने, एकल व्यक्ती कुटुंबांचे जागतिक स्तरावर एकूण कुटुंबांतील प्रमाण २०व्या शतकाच्या प्रारंभी अल्पस्वल्प म्हणजे १० टक्क्यांच्या परिघात होते. या प्रमाणात हळूहळू वाढ दिसायला येऊ लागली ती २०व्या शतकाच्या

मध्यापासून. १९८५ सालादरम्यान हे प्रमाण पोहोचले होते २३ टक्क्यांवर. त्या नंतरच्या तीन दशकांमध्ये (म्हणजे, २०१८ साली) त्यांत वाढ होऊन ते टेकले २८ टक्क्यांना. हा कल असाच इथून पुढेही कायम राहिला तर, एकल व्यक्ती कुटुंबांचे एकूणांतील प्रमाण, जागतिक स्तरावर चालू शतकाच्या मध्यादरम्यान जवळपास ३५ टक्क्यांवर पोहोचेल असे अभ्यासकांचे अंदाज सांगतात. अर्थात, आज तरी हा कल मुख्यत: विकसित व श्रीमंत देशांमध्ये अधिक प्रकर्षाने आढळून येतो आहे. जगाच्या विकसनशील देशांच्या पट्ट्यात आजही हे प्रमाण १० टक्क्यांच्या आतच दिसते. नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, जर्मनी, रशिया या देशांत २०२० साली हे प्रमाण उंचावले होते चांगले ४० टक्क्यांपेक्षा अधिक. त्याच साली, अमेरिकेत एकल व्यक्ती कुटुंबांचे एकूणांतील प्रमाण होते २८ टक्के इतके. अमेरिकेतील प्रौढांमध्ये विवाहितांचे प्रमाण १९९० साली होते ५९ टक्के इतके. त्या नंतरच्या ३० वर्षांमध्ये (२०२३ साली) तेच प्रमाण उतरलेले दिसले ५१ टक्क्यांवर! आशिया खंडातील चीन आणि भारत या दोन महाकाय देशांमध्ये एकल व्यक्ती कुटुंबांचे एकूणांतील प्रमाण, २०२० साली, होते अनुक्रमे २५ टक्के आणि १६ टक्के असे.

जागतिक स्तरावरील एकंदर लोकसंख्येचे चित्र पाहिले तर, एकल जीवन जगणाऱ्या प्रौढांचे प्रमाण आजवरच्या इतिहासात आजमितीस सर्वाधिक दिसते. एकेकट्याने जगण्याची मानसिकता बळावण्यामागील कारणांचा मानसशास्त्राचे अभ्यासक आताशा आस्थेने शोध घेत आहेत. आजवरच्या अभ्यासांनुसार, एकल जीवन जगणाऱ्यांचे, ढोबळ मानाने, चार मुख्य गटांमध्ये अथवा प्रकारांमध्ये वर्गीकरण करता येते. स्वेच्छेने एकेकटे जगणाऱ्यांचा पहिला गट सांगता येईल. या गटात पुन्हा दोन उपगट दिसतात. त्यांतील, एक उपगट होय

स्वेच्छेने तात्कालिक एकलपण अनुभवणाऱ्यांचा; तर, दुसरा उपगट होय चिरंतन एकेकटे जीवन व्यतीत करण्याचा निर्णय स्वेच्छेनेच घेणाऱ्यांचा. तात्पुरते अथवा तात्कालिक अथवा हंगामी एकल जीवन स्वेच्छेने अंगीकारलेले सगळे स्त्री-पुरुष या पहिल्या गटात समाविष्ट होतात. जोडीदाराच्या शोधात असलेले अविवाहित परंतु लग्नाळू तरूण-तरुणी, लग्न लांबणीवर टाकणारी मुले व मुली, विभक्त होऊन पुनर्विवाहाच्या प्रयत्नांत असणाऱ्या सगळ्यांचा अंतर्भाव इथे होतो. स्वेच्छेनेच एकल जीवन चिरंतन निवडणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या गटात समावेश असणाऱ्यांनी कधीच विवाहबंधनात न अडकण्याचा अथवा कोणातही भावनिक गुंतवणूक करून न घेण्याचा पक्का विचार केलेला असतो.

दुसरा मोठा गट दिसतो तो निरुपायाने एकटेपण वाट्याला आलेल्यांचा. पहिल्याप्रमाणेच, या दुसऱ्या मोठ्या गटातही पुन्हा दोन उपगट दिसतात. निव्वळ निरुपायाने हंगामी अथवा तात्कालिक वा तात्पुरते एकलपण वाट्याला आलेले सगळे मोडतात पहिल्या उपगटात. लग्नाची इच्छा आहे परंतु लग्न जुळत नाही म्हणून, अथवा, एकदा लग्न होऊन विभक्तपण वाट्याला आलेले असल्याने पुनर्विवाहाच्या प्रतीक्षेत असणारे स्त्री-पुरुष होत या उपगटाचे सदस्य. जोडीदार शोधण्याची अथवा/आणि भावनिक स्तरावर कोणाशी ना कोणाशी नातेसंबंध निर्माण करण्याची इच्छा असणारे हे सर्वजण होत. परंतु, मनासारखा जोडीदार मिळत नाही म्हणून त्याच्या अथवा तिच्या प्रतीक्षेत हे सगळे असतात. विकसित देशांमध्ये या उपगटात तुलनेने आज अधिक प्रमाण दिसते ते आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी अशा उच्चशिक्षित मुलींचे. जोडीदारांकडून त्यांना आर्थिक आधाराची अथवा स्थैर्याची अपेक्षा आज मुळीच नसते. त्यांना अपेक्षा असते समजुतदार, जोडीदाराबाबत समतेची भावना जोपासणाऱ्या, त्याचे मन जाणून घेणाऱ्या आणि जाणून घेण्यात रस असलेल्या जीवनसाथीची. तर, अहेतूक अथवा निरुपायाने एकल जीवन चिरंतन पदरी आलेले सगळे जमा होतात ते दुसऱ्या उपगटात. विधूर पुरुष, विधवा, प्रौढ घटस्फोटित, परित्यक्त असे सगळे उपप्रकार या उपगटात मोडतात. लग्न करण्यात अगर/आणि कोणाशी ना कोणाशी भावनिक नाते जुळविण्यास हे अनुत्सुक असतात अशातला भाग अजिबात नाही. परंतु, तसे कोणी अथवा तशी कोणी न गवसल्याने त्यांना एकल जीवन कंठावे लागते.

निरुपायाने एकेकटे जगणे वाट्याला आलेल्यांच्या या उपगटात, विशेषत: प्रौढ वयात, नाना प्रकारच्या मानसिक विकारांचा प्रादुर्भाव तुलनेने अधिक प्रमाणात आढळून येतो. सरासरीने बघायला गेले तर, उतार वयात एकाकी जीवन जगणाऱ्यांचे एकूणांतील प्रमाण, ३० वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या वयोगटांतील एकलांच्या प्रमाणापेक्षा अधिक भरते. जवळपास दोन डझनांहून अधिक युरोपीय देश असे आहेत की, त्या देशांमधील एकंदर प्रौढ कुटुंबांमधील जवळपास एक तृतीयांश प्रौढ कुटुंबे एकल व्यक्ती कुटुंबे आहेत. डेन्मार्क, एस्टोनिया, फिनलंड, लिथुआनिया आणि स्वीडन या देशांमध्ये तर, वृद्ध अगर प्रौढ कुटुंबांचे प्रमाण, एकूण कुटुंबांत, ४० टक्क्यांपेक्षाही अधिक दिसते. एकेकट्याने जगण्याकडे वाढत असलेल्या या प्रवृत्तीच्या मुळाशी असणाऱ्या कारणांबाबत सर्वत्र आताशा उहापोह चालू आहे. यांत तंत्रशास्त्रीय प्रगतीचे योगदानदेखील मोठे आहे. हा कल बलवत्तर बनण्यास

अनेक अंगांनी बदललेली जीवनशैली व जीवनरीत यांचाही हातभार लागतो आहे.

ही कारणे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, लोकसंख्याविषयक अशी बहुविध दिसत असली तरी, चाकोरीबाहेरील जीवन जगण्याची मोकळीक पूर्वीपेक्षा सगळ्यांनाच अधिक प्रमाणात आज लाभते आहे, हे या सगळ्यांतील मुख्य कारण दिसते. समाजाच्या विविध स्तरांत सर्वदूर व सखोल झिरपत असलेली आर्थिक सुबत्ता हा या सगळ्यांतील मुख्य कणा होय. वैयक्तिक जीवनात यशाची अधिकाधिक उंच शिखरे गाठण्याची असोशी आणि त्यासाठी आवश्यक असणारी जीवनपद्धती अनुसरण्यास मिळणारा सामाजिक-सांस्कृतिक अवकाश या सगळ्यांत अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतो. व्यावसायिक व व्यावहारिक स्तरावरील उंच ध्येये गाठण्याच्या ऊर्मीची ऊर्जा या प्रवृत्तीला सतत इंधनपुरवठा करत राहते. शिक्षणाच्या संधींचा विस्तार हे सगळे शक्यतेच्या कोटीत आणून ठेवतो आहे. त्याच्याच जोडीने, देशोदेशींच्या शासनसंस्थादेखील व्यक्तींना, या ना त्या स्वरूपात, सामाजिक सुरक्षेचे कवच पुरविण्यात हिरिरीने पुढाकार घेताना दिसतात. परिणामी, आर्थिक परावलंबन अथवा हतबलता वा परवशता भाळी लादली जाण्याची संभाव्यतादेखील निकालात निघते. परिणामी, लग्न अगर भावनिक गुंतवणूक शक्यतो व शक्य तेवढी लांबणीवर टाकणे, विवाहानंतर जोडीदाराबरोबरील विसंवादाची केवळ झलक दिसली तरी विभक्त होण्याचे पाऊल उचलणे, एकदा विभक्त झाल्यानंतर पुन्हा लग्नच न करणे, प्रसंगवशात जोडीदाराचा मृत्यू झाल्यास विवाहबंधनात पुन्हा न अडकणे... अशा प्रेरणा आताशा सर्वत्र मूळ धरताना दिसतात.

एकंदरीनेच, जगण्यासंदर्भातील बदललेल्या धारणा आणि जीवनातील प्राधान्यक्रमात घडून येत असलेले परिवर्तन हा, एकल जीवनशैलीबाबतचे आकर्षण वाढते राहण्यामागील अतिशय महत्त्वाचा घटक दिसतो. कुटुंब आणि अपत्यधारणा या दोन बाबींचे पूर्वकालीन महत्व आज झपाट्याने ओसरलेले आहे. शक्यतो लग्न उशीरा करणे, लग्न झाल्यानंतरही अपत्यसंभव लांबवणे आणि जोडीदाराशी अंमळ मतभेद झाले तरी घटस्फोट घेऊन मोकळे होणे...या बाबी आताशा लक्षणीयरीत्या वाढत आहेत, वाढलेल्या आहेत. समाजजीवनातील स्त्रियांच्या स्थानात घडून आलेले गुणात्मक स्थित्यंतर या सगळ्याच्या मुळाशी मुख्यत्वेकरून दिसते. उच्च शिक्षणाच्या संधी आणि त्यांमुळे उच्च शिक्षणाकडे मुलींचा कल वाढतो आहे. शैक्षणिक गुणवत्ता व पात्रता सक्षम बनल्याने नोकरी व रोजगाराच्या संधींची क्षितिजे मुली व स्त्रियांसाठी झपाट्याने विस्तारत आहेत. साहजिकच, स्त्रियांचा श्रमदलातील सहभाग, पूर्वीच्या

तुलनेत, आज कैक पटींनी अधिक विस्तारलेला दिसतो. त्यांमुळे, महिलांना अपूर्व असे आर्थिक स्वातंत्र्य आजघडीस उपभोगावयास मिळते आहे. या सगळ्यांद्वारे स्त्रियांचा सामाजिक दर्जा विलक्षण वाढलेला असून लग्नापासून ते अपत्यधारणेपर्यंत सर्वत्रच निर्णयप्रक्रियेतील त्यांचा सहभाग निर्णायक शाबीत होताना दिसतो.

हे जरी असे असले तरी, एकल जीवनशैलीकडे कल वाढता दिसण्यास व्यापक स्तरावरील अन्य कारणेदेखील तितकीच जबाबदार आहेत. सर्वच देशांमध्ये झपाट्याने विस्तारणारे नागरीकरण, हा त्यांतील कदाचित सर्वांत प्रमुख घटक ठरावा. विस्तारणाऱ्या शहरीकरणापायी शहरी भागांत निवासी घरांच्या मागणीत अप्रतिहत वाढ अनुभवास येते. शहरी जमिनी आणि शहरी निवारा यांचा पुरवठा त्या मानाने अ-लवचीक असतो (निदान, '**शॉर्ट टर्म**'मध्ये तरी !). त्यांमुळे, सगळीकडेच घरांच्या किमतींमध्ये प्रचंड वाढ होताना दिसते. सर्वसाधारण नोकरदार वर्गाच्या आवाक्याबाहेर जात असलेले निवासी गाळ्यांचे बाजारभाव हे एकल जीवनशैली स्वीकारण्यामागील एक मोठे कारण आज ठरते आहे. घरांच्या किमती चढ्या असतील तर व असतात तेव्हा घरभाड्यांची सरासरी पातळीदेखील चढती कमान दाखवत असते. त्यांमुळे, लग्न करून संसार करत कुटुंबवत्सल जीवनशैली व्यतीत करणे अनेकांना उत्तरोत्तर अवघड बनत चाललेले आहे. सक्तीचे एकलपण पदरी येण्याचे हेदेखील एक मोठे व मुख्य कारण आज ठरताना दिसते.

एकल जिणे भाळी लादले गेलेल्या (अथवा, स्वेच्छेने स्वीकारलेल्या) व्यक्ती निराश, उदास, दु:खी-कष्टी, हतबल जीवन कंठत राहतात, असा पूर्वी सर्वदूर प्रचलित असलेला समजदेखील अनाठायी व बिनबुडाचा असल्याचे आताशा शाबीत होते आहे. स्वेच्छेने एकेकटे जगणारे स्त्री-पुरूष चांगल्यापैकी मजेत राहतात, असे चित्र आज वाढत्या प्रमाणात दिसते. परंतु, यांत वयाचाही भाग मोठा आहे व असतो. निरुपायाने एकलपण पदरी आलेले दु:खी-कष्टी दिसतात, हेदेखील नाकारता न येण्याजोगे असेच वास्तव आहे. परंतु, त्याच प्रमाणे, जसजसे वय वाढत जाते तसतशी एकटेपणाची भावना अधिकाधिक तीव्र बनून छळू लागते, हेदेखील तितकेच सत्य होय. त्यांपायी नानाविध भावनिक ताणतणाव, चिंताग्रस्तता, एकलकोंडेपणा वाढीस लागून मानसिक आजारांचा उद्‌भव होण्याचे प्रमाणदेखील अनेक देशांमध्ये वाढताना दिसते. त्यांतच, भरीस भर म्हणून की काय, आर्थिक ओढगस्त, कर्जबाजारीपणा, तब्येतीच्या कारणांपायी औषधोपचारांवरील वाढता खर्च अशाही विवंचना पाठ सोडत नसतील तर तशा एकल व्यक्तींच्या दुरवस्थेस मग पारावारच

राहत नाही. त्यांतून मग तशा त्या एकेकट्या व्यक्तींचा सामाजिक संपर्कही वेगाने विरळ होऊ लागतो. कोणाशी तरी गप्पा-टप्पा करणे अगर शिळोप्याचे चार शब्द बोलणेही दुरावते. त्यांपायी, कालांतराने, स्मृतिभ्रंशासारख्या दुर्धर व्याधीदेखील निर्माण होण्याच्या शक्यता बळावतात.

एकल जिणे जगणाऱ्यांच्या विश्वाचे विद्यमान चित्र हे असे आहे. या वास्तवापायी पुढ्यात येणाऱ्या समस्या, एका विशिष्ट टप्प्यानंतर निखळ व्यक्तिगत स्वरूपाच्या उरत नाहीत. त्यांना व्यापक असे सामाजिक आव्हानाचे स्वरूप प्राप्त होते. मग, साहजिकच, शासनसंस्थेच्या लेखीदेखील ती दखलपात्र बाब बनते. एकेकट्याने जगण्याकडे आज झुकू लागलेला कल या पुढे असाच अधिक सघन होऊ लागला तर, त्यांतून निपजणाऱ्या समस्यांची तीव्रता कमी करण्यासाठी शासनसंस्थेला कशा प्रकारची धोरणे आखावी व अवलंबावी लागतील, यांबाबत आजमितीस श्रीमंत देशांमध्ये चौफेर चर्चामसलत आकार घेते आहे. वयोवृद्ध व विशेषत: नानाविध शारीरिक आणि/अथवा मानसिक व्याधींचे शिकार बनलेल्या एकल व्यक्तींना सर्व प्रकारचा आधार सर्वतोपरी पुरविण्यासाठी कशा प्रकारे उपक्रम राबवावे लागतील, हा त्या चर्चाविश्वाचा केंद्रबिंदू बनतो आहे. निराधार व निर्धन एकल व्यक्तींना कशा प्रकारचे सामाजिक सुरक्षा कवच निर्माण करावे, हा तितकाच कळीचा विषय बनतो आहे. कोणत्या प्रकारच्या आरोग्यसुविधांचे जाळे (शरीर आणि मन या दोहोंच्याबाबतीत उद्‌भवणाऱ्या आजारांवर उपचार करण्यासाठी) निर्माण करणे भाग आहे, हा या संदर्भातील चिंतनाचा आणखी एक कळीचा मुद्दा. हे सगळे करण्याने शासनसंस्थेच्या तिजोरीवर पडणारा वाढता भार सोसावा तरी कसा हा मग ठरतो त्यांपुढील यक्षप्रश्न!

एकेकटे जीवन व्यतीत करण्याची जीवनशैली एकीकडे वाढत असतानाच, दुसरीकडे, सरासरीने जननदरातही आता झपाट्याने घट होताना दिसते आहे. एकंदरीने कमी संख्येनेच मुले जन्माला घालण्याची प्रवृत्तीदेखील, समांतररीत्या, मूळ धरू लागली तर उद्याच्या जगातील समाजचित्र नेमके कसे दिसेल, हा चिंतनीय (आणि तितकाच चिंताजनकही!) अभ्यासविषय ठरतो. ■■

# पर्यावरण

## जगाचे फुफ्फुस धोक्यात

पृथ्वीवरील सर्वांत मोठे वर्षावन असणाऱ्या अमेझॉनला 'जगाचे फुफुस' म्हणून ओळखले जाते. जगातील सर्वांत मोठे असे हे वर्षावन पृथ्वीवरील ऑक्सिजन मोठ्या प्रमाणावर एकट्याने तयार करण्याचे महत्त्वाचे काम करते. तसेच मोठ्या प्रमाणावर कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेत असल्याने पृथ्वीवरील हवामान बदलाचा वेग कमी होण्यास त्याची मोठी मदत मिळते. हे जगाचे फुपफुस आजच्या घडीला विविध कारणांमुळे धोक्यात येत चालले आहे, असा गंभीर इशारा अभ्यासकांनी दिला आहे.

मोठ्या प्रमाणावर होणारी जंगलतोड आणि हवामानबदलाचे होत असलेले गंभीर परिणाम या दोन गोष्टी त्याला प्रामुख्याने कारणीभूत ठरत असल्याचे जाणकारांचे मत आहे. सातत्याने लागणाऱ्या आणि लावल्या जाणाऱ्या आगींमुळे खूप मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाचे नुकसान होते आहे. ॲमेझॉनची जंगले ही दलदल आणि गवताळ प्रवेशाने व्यापलेली आहेत. या जंगलांमध्ये जैवविविधतादेखील प्रचंड आहे. ४० हजार प्रकारच्या वनस्पती या जंगलात असल्याचा दावा अभ्यासक करतात. त्यामध्ये अनेक दुर्मिळ आणि फक्त ॲमेझॉनच्या जंगलातच सापडतील अशाही वनस्पतींचा समावेश आहे. येथे सस्तन प्राण्यांच्या ५२५ हून अधिक प्रजाती आणि सरपटणाऱ्या प्राण्यांच्या ३७५ हून अधिक प्रजातींचा समावेश आहे. तसेच सुमारे तीन हजारांहून अधिक माशांचे प्रकार येथे आहेत. त्यामुळे ॲमेझॉनचे जंगल म्हणजे एक स्वतंत्र परिसंस्थाच आहे असे मानले जाते.

शेकडो प्रकारच्या स्थानिक समुदायांचे हे आश्रयस्थान आहे. जगातील सर्वांत मोठी ॲमेझॉन नदीसुद्धा इथूनच वाहते आणि या नदीच्या तब्बल ११ उपनद्या आहेत. गोड्या पाण्याचा सर्वांत मोठा स्रोतदेखील येथेच आहे. हे पाणी पुढे अटलांटिक समुद्राला मिळते. मात्र, ॲमेझॉनच्या या जंगलातून कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन

वाढत असल्याचे आता दिसून येत असल्याने अभ्यासकांच्या चिंतेत भर पडली आहे. जंगलांची तोड, जमिनीचा ऱ्हास या गोष्टी जशा त्याला कारणीभूत आहेत त्याचप्रमाणे तापमानातील वाढ, दीर्घकाळ सुरू असलेला दुष्काळ आणि जंगलात सतत पेटत असलेले वणवे हेदेखील ॲमेझॉनच्या समृद्धतेला आणि संपन्नतेला बाधा आणत आहेत. एरवी हिरवेगार असणारे हे जंगल आता अनेक ठिकाणी कोरडे पडत चालले असून त्याचे अनेक भाग आगीच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत. त्यामुळे या भागातील नैसर्गिक संतुलनावरही त्याचा अनिष्ट परिणाम झालेला आहे, असे निरीक्षण या संदर्भात अभ्यासक नोंदवतात.

**वृक्षतोडीची गंभीर समस्या**

ॲमेझॉनच्या जंगलात मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड हा केवळ पर्यावरणाचाच नाही तर संपूर्ण पृथ्वीवरील जैवविविधतेचा आणि हवामानाचा अत्यंत गंभीर असा प्रश्न आहे. दक्षिण अमेरिकेतील नऊ देशांमध्ये पसरलेले ॲमेझॉनचे हे जंगल हे जगातील सर्वांत मोठे उष्णकटिबंधीय जंगल आहे. 'पृथ्वीचे फुपफुस' म्हणून ओळखले जाणारे हे जंगल ऑक्सिजनची निर्मिती, कार्बनचे उत्सर्जन, जलचक्र संतुलन आणि लाखो प्रजातींचा निवास या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. तथापि, गेल्या काही वर्षांत वृक्षतोडीच्या समस्येने इथे अनेक गंभीर प्रश्न निर्माण केलेले आहेत.

ॲमेझॉनमधील जंगलतोडीचे मुख्य कारण म्हणजे कृषिविस्तार. सोयाबीन, ऊस आणि इतर खाद्यपिकांच्या उत्पादनासाठी या भागात शेती केली जाते. त्या शेतीसाठी जमीन मिळावी म्हणून वृक्षतोड केली जाते. तसेच गाई-म्हशींना चरायला जागा मिळावी म्हणूनदेखील वनक्षेत्रे साफ केली जातात. ब्राझीलमध्ये मांसनिर्मिती उद्योगात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. त्यामुळे पशुपालनाकडे लोकांचा कल वाढतो आहे. जनावरे बाळगण्यासाठी आणि चारण्यासाठी जी जागा लागते ती वृक्षतोड करून मिळवली जाते. बेकायदेशीर लाकूडतोड हीदेखील एक मोठी समस्या आहेत. जंगलात झाडांची समृद्धता असल्याकारणाने तेथील महागडी झाडे अवैध मार्गाने तोडून त्यांची तस्करी केली जाते. नियमबाह्य पद्धतीने होणारी ही वृक्षतोड हे पर्यावरणाचे नुकसान होण्याचे मुख्य कारण मानले जाते.

आधुनिक युगामध्ये खनिजे फार महत्त्वाची ठरत आहेत. त्यामुळे सोने, बॉक्साईट आणि लोखंड या सारख्या खनिजांचा शोध घेण्यासाठी जंगलाच्या आतमध्ये खोलवर जाऊन शोध घेणाऱ्यांची संख्या वाढली आहे. जंगलात खनिजे शोधतानादेखील वृक्षतोड मोठ्या प्रमाणावर होते आणि त्यातून जमिनीचे आणि पर्यावरणाचे अतोनात

नुकसान होते. पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी जेव्हा पावले उचलली जातात तेव्हादेखील पर्यावरणाचा ऱ्हास अधिक होतो. रस्तेबांधणी, धरणे बांधणे आणि नवनवीन नागरी सुविधा निर्माण करतेवेळी तिथे वृक्षतोड केली जाते. जेव्हा रस्ते तयार होतात तेव्हा जंगलात होणारी वृक्षतोड अधिकच वाढते, हे देखील अभ्यासकांच्या निदर्शनास आलेले आहे.

पृथ्वीवर ज्ञात असलेल्या एकूण प्रजातींपैकी १० टक्के प्रजाती एकट्या ॲमेझॉनच्या जंगलात आहेत, असा अभ्यासकांचा सांगावा आहे. परंतु, गेल्या काही वर्षांत वाढत्या वृक्षतोडीचे परिणाम या जंगलातही दिसून येऊ लागले आहेत. हवामानबदलाचे परिणाम येथेदेखील जाणवू लागले आहेत. वाढत्या वृक्षतोडीमुळे कार्बन डॉय ऑक्साईडचे उत्सर्जन वाढते, एकूण दैनंदिन तापमानात वाढ होते, जागतिक हवामानाचे चक्र असंतुलित होते. वृक्षतोडीमुळे पर्जन्यमान बदलते आणि कालांतराने दुष्काळाची परिस्थिती निर्माण होऊ लागते. हा परिणाम अलीकडच्या काळातील आकडेवारीवरून समोर आले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर आता वृक्षतोडीची समस्या गंभीर बनली असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यावर प्रभावी असा तोडगा काढणे गरजेचे झालेले आहे. त्यामुळे खाणकाम करणारी माणसे आणि बेकायदेशीररीत्या वृक्षतोड करणारे तस्कर यांच्यावर कडक निर्बंध जारी करणे गरजेचे बनले आहेत. जमिनीचा अधिकाधिक पुनर्वापर करणे आणि त्याचप्रमाणे पारंपरिक शेतीला प्रोत्साहन देणे आता गरजेचे झालेले आहे. ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झालेली आहे त्या ठिकाणी नव्याने झाडे लावण्यासाठी विशेष प्रयत्न गरजेचे आहेत. ॲमेझॉनचे जंगल ही केवळ दक्षिण आफ्रिकेची मालकी असणारा भूभाग नसून तो जागतिक निसर्गसंपदेचा वारसा आहे हे लक्षात घेऊन त्याच्या संरक्षण-संवर्धनासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरून सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे, अशी भूमिका या क्षेत्रातील जाणकारांकडून व्यक्त होते आहे. २००० सालापर्यंत ॲमेझॉनच्या जंगलातील वृक्षतोडीचे प्रमाण खूप जास्त होते. त्यानंतर २०१० सालापर्यंत हे प्रमाण काहीसे कमी आले होते. परंतु २०२१ सालानंतर मात्र हे प्रमाण पुन्हा एकवार लक्षणीय वाढले.

ज्या प्रमाणे वृक्षतोड ही एक गंभीर समस्या आहे त्याचप्रमाणे जंगलांमध्ये लागणाऱ्या आगी हेसुद्धा जंगल नष्ट होण्याचे प्रमुख कारण मानले जाते आहे. २०२४ साली ॲमेझॉनच्या जंगलांमध्ये आग लागण्याची १लाख ४० हजार ठिकाणे निदर्शनास आलेली होती. २०२३ सालच्या तुलनेत हे प्रमाण जवळपास दुप्पट झाल्याचे दिसून आले आहे. २००७ सालानंतर हे सर्वाधिक प्रमाण वाढल्याचे अभ्यासकांच्या लक्षात

आले आहे. २०२४ सालच्या ऑगस्ट महिन्यामध्ये ॲमेझॉनच्या जंगलात लागलेल्या आगीत नष्ट झालेले वनक्षेत्र ६ लाख ८५ हजार हेक्टर इतके होते. २०२३ च्या तुलनेत हे प्रमाण तब्बल १३२ टक्क्यांहून जास्त आहे. या आगींमध्ये केवळ जंगलच नाही तर कृषिक्षेत्राचेही खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान होते आहे. Greenpeace या संस्थेने या संदर्भात एक अहवाल प्रकाशित केलेला असून त्यानुसार, २०२४ साली ॲमेझॉनच्या जंगलात लागलेल्या आगींचे प्रमाण अलीकडच्या काळातील सर्व वर्षांतील आगीच्या तुलनेत सर्वाधिक होते. अशा आगींमुळे जंगले ताबडतोब नष्ट होत नाहीत परंतु जंगलातील जमिनींची गुणवत्ता घसरते. तसेच स्थानिक जनजाती, वन्यजीवांवर त्याचा विपरित परिणाम होतो. वनातील एकूणच परिसंस्था यातून धोक्यात येऊ शकते अशी भीती अभ्यासक वर्तवतात.

एकूण हे सगळे धोके लक्षात घेता 'जगाचे फुपफुस' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ॲमेझॉन जंगलातील समृद्धता, वैविध्यता आणि संपन्नता टिकवण्याची जबाबदारी केवळ एका देशाची नाही तर सगळ्या जगाचीच आहे. त्यासाठी एकेका समस्येच्या संदर्भात अभ्यास करून ती सोडवण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम राबवण्याची गरज आहे. अवैध वृक्षतोड, तस्करी आणि बेकायदेशीर रीतीने होणाऱ्या गोष्टी रोखण्यासाठी सातत्याने कठोर उपाययोजना राबवणे गरजेचे आहे. यातील अनेक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य अत्यंत आवश्यक बाब ठरणार आहे. आवश्यक तिथे आंतरराष्ट्रीय स्तरावरून निधी उपलब्ध करून देऊन ॲमेझॉनच्या जंगलांना हरप्रकारे वाचवणे गरजेचे आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर जागरूकता निर्माण करणेही गरजेचे असल्याचे अभ्यासकांचे मत आहे.

मानवनिर्मित विविध कारणांमुळे जंगलाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे हे असेच सुरू राहिले तर २०५० सालापर्यंत ॲमेझॉन जंगल दुर्धर अशा पर्यावरणीय संकटात सापडू शकते, असा धोक्याचा इशारा अभ्यासकांकडून दिला जातो आहे. जंगलाची नैसर्गिक रचना एकदा बदलली की, त्याचा मोठा भाग कोरडाठाक बनू शकतो. जगाचे हे फुपफुस उत्कृष्ट रीतीने कार्यरत राहणे ही भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाची आणि दुर्लक्ष करता न येण्यासारखी बाब आहे.

# सामाजिक

## घटता एकूण जननदर काय सूचित करतो?

सतत वाढणारी लोकसंख्या हा विकासाच्या एका टप्प्यावर सर्व जगालाच सचिंत बनविणारा विषय बनून राहिलेला होता. परंतु, अलीकडील वास्तव मात्र वेगळेच आहे. आताशा, जगभरात सर्वत्रच, सरासरी जननदर सातत्याने घटत चालल्याचे चित्र संबंधित आकडेवारी पुढ्यात चितारते आहे. लोकसंख्याशास्त्राचे अभ्यासक व संशोधक त्यांमुळे सचिंत बनताना दिसतात. परिणामी, सुदूर भविष्यातील समाजाची संरचना नेमकी कशी असेल, जननदर सातत्याने घटत राहण्याने कोणत्या प्रकारच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक समस्या उद्याच्या समाजाच्या पुढ्यात उभ्या ठाकतील, लोकसंख्येचे आकारमान आणि वयानुसारी वर्गीकरण यांत यापायी घडून येणाऱ्या बदलांपायी येत्या काळातील विकासाच्या प्रक्रियेवर नेमके कोणते परिणाम संभवतात, आर्थिक-सामाजिक विकासाला गती देण्यासाठी, तशा परिस्थितीत, जी धोरणे आखावी लागतील त्यांचे अंतरंग नेमके कसे असेल व असावे...अशांसारख्या विविध पैलूंना स्पर्शणारे चर्चाविश्व आता हळूहळू आकार घेते आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक..अशा नानाविध आणि परस्परांशी गुंफलेल्या कारणांचे एक मोठे जाळेच या वस्तुस्थितीच्या मुळाशी दिसते.

या संदर्भात अभ्यासकांकडून मांडली जाणारी आकडेवारी मोठी रोचक आहे. गेल्या सात दशकांदरम्यान जगभरातच सरासरीने एकंदर जननदरात लक्षणीय घट घडून आलेली आहे. वैश्विक स्तरावर १९५० साली जननदर होता सरासरीने पाच इतका. आता, २०२१ साली, त्यांत घट होऊन तो खाली आलेला आहे २.२ वर. 'जननदर' ही लोकसंख्याशास्त्रातील एक शास्त्रीय संकल्पना होय. कोणाही महिलेला तिच्या जननक्षम जीवनकाळात जितकी अपत्ये होतात त्याच्या सरासरीला 'एकंदर जननदर' (टोटल फर्टिलिटी रेट) असे संबोधले जाते. जगभरातील २०४ देशांपैकी तब्बल ११० देशांमध्ये हा जननदर २०२१ साली लोकसंख्येच्या 'फर्टिलिटी रिप्लेसमेन्ट

रेट’पेक्षाही खाली घसरलेला दिसला. विद्यमान पिढीने तिच्या आईवडिलांची जागा घेत एकंदर लोकसंख्या तिच्या स्थिरीकरणाच्या पातळीकडे नेण्यासाठी जो जननदर आवश्यक असतो त्याला लोकसंख्याशास्त्रामध्ये ‘फर्टिलिटी रिप्लेसमेन्ट रेट’ असे म्हणतात. त्या दृष्टीने, दर महिलेला तिच्या प्रजननक्षम वयोमर्यादेदरम्यान सरासरीने २.१ अपत्ये हा (आवश्यक) ‘फर्टिलिटी रिप्लेसमेन्ट रेट’ गणला जातो. म्हणजेच, दर महिलेने तिच्या जननक्षम जीवनकाळात किमान २.१ अपत्यांना जन्म दिला तर लोकसंख्या वाढ सातत्यशील राहून अंतिमत: ती स्थिरीकरणाच्या पातळीकडे वाटचाल करते. या संज्ञेला मराठी परिभाषा योजायची झाली तर, ‘फर्टिलिटी रिप्लेसमेन्ट रेट’चे मराठी रूपांतर ‘प्रतिस्थापना जननदर’ असे सांगता येईल. म्हणजेच, चालू पिढीने, भविष्यात तिची जागा घेणारी पिढी निर्माण करण्यासाठी विद्यमान पिढीतील प्रत्येक महिलेने सरासरीने किमान २.१अपत्ये जन्माला घालणे अपेक्षित गणले जाते. येत्या दशकांदरम्यान जागतिक स्तरावरच, सरासरी जननदरात अधिकच घसरण घडून येईल असे अभ्यासकांचे अंदाज आहेत. अर्थात, हे अंदाज काही गृहीतकांवर बेतलेले आहेत. त्यांमुळे, त्यांच्या स्वीकृतीबाबत पुरेसे तारतम्य बाळगणे सुज्ञपणाचे ठरते. परंतु, त्यांमुळे वैश्विक स्तरावरील लोकसंख्येच्या भविष्यकालीन वाटचालीची ढोबळ दिशा फारशी बदलत नाही, हेही तितकेच खरे.

अलीकडील काळात, जगभरच, एकूण जननदराची सरासरी पातळी ज्या प्रकारे खाली येते आहे ती बघता, लोकसंख्याशास्त्रज्ञांनी येत्या अर्धशतकभरादरम्यान या संदर्भात सर्वसाधारण चित्र कसे दिसेल या संदर्भातील काही अंदाज बांधलेले आहेत. त्यांनुसार, २०५० सालादरम्यान वैश्विक स्तरावर एकंदर जननदर सरासरीने दर महिलेला १.८ अपत्ये असा राहील. तर, त्या नंतरच्या अर्धशतकभरात, म्हणजे, २१०० सालादरम्यान त्यांत अधिक घट होऊन तो १.६ असा दिसावा. या संदर्भात, तुलनेने, अधिक चिंताजनक परिस्थिती संभवते ती दक्षिण कोरिया आणि सर्बिया या दोन देशांची. कारण, विद्यमान अंदाजांनुसार या दोन देशांत एकूण जननदर सरासरीने दर महिलेस १.१ अपत्यापेक्षाही कमी असेल. जगभरातील २०४ देशांपैकी, या अंदाजानुसार, २१०० साली जगात केवळ सहाच देश असे दिसतील की ज्यांचा एकंदर जननदर हा दर महिलेस सरासरी २.१ अपत्ये यांपेक्षा अधिक राहील. सामोआ, सोमालिया, टोन्गा, नायजेर,चाड आणि ताजिकिस्तान हे होत ते सहा देश. परंतु, त्याच दरम्यान जगात १३ देश असे असतील की जिथे एकंदर जननदर हा दर महिलेस सरासरी एक अपत्य यापेक्षाही खाली असेल. भूतान, बांगलादेश,

नेपाळ व सौदी अरेबियासारख्या देशांचा समावेश त्या गटात असेल, असे अभ्यासकांचे कयास सांगतात.

मात्र, या संदर्भात जगाच्या निरनिराळ्या भागांमध्ये वेगवेगळे चित्र संभवते. जननदर सरासरीने घटता राहण्याची प्रवृत्ती जरी सार्वत्रिक दिसत असली तरी तिच्यात देश व प्रांतनिहाय वैविध्यही खूप संभवते. पश्चिम युरोपातील देशांचा सरासरीने विचार केला तर, २०५० सालादरम्यान तिथे एकंदर जननदर १.४४ अपत्ये दर महिलेस असा दिसेल. हाच दर २१०० साली १.३७ अपत्यांपर्यंत खाली येईल. इस्त्रायल, आइसलन्ड, डेन्मार्क, फ्रान्स व जर्मनी या देशांमध्ये एकूण जननदर, दर महिलेस सरासरीने कमाल २.०९ अपत्ये ते किमान १.४० अपत्ये यांदरम्यान राहावा. उर्वरित युरोप आणि आशिया खंडाच्या काही भागांतदेखील एकंदर जननदर सरासरीने बरेच खालच्या पातळीवर राहतील. जगभरात एकंदरीने जी जीवित बालके येत्या काळात जन्माला येतील त्यांचे भूभागनिहाय विभाजनदेखील, यांमुळे, मोठे अभ्यसनीय राहील. येत्या काळात जगभरात सर्वत्र जेवढी जीवित बालके जन्माला येतील त्यांत जगाच्या निरनिराळ्या पट्ट्यांतील सहा भूभागांचा असणारा तौलनिक हिस्सा भविष्यात घटता राहील, असे लोकसंख्याशास्त्राभ्यासकांचे अंदाज सांगतात. उदाहरणार्थ, २०२१ साली जगात सर्वत्र जितकी जीवित बालके जन्माला आली त्यांत, दक्षिण आशियामध्ये जन्माला आलेल्या बालकांचे प्रमाण होते २५ टक्क्यांच्या घरात. २०५० सालादरम्यान हेच प्रमाण उतरेल साधारणपणे १७ टक्क्यांच्या परिघात. तर, या प्रमाणात त्यांपुढील अर्धशतकात अधिकच घट घडून येऊन, २१०० साली, ते सात टक्क्यांपर्यंत खाली घसरेल, अशी शक्यता संबंधित आकडेमोड दर्शविते.

जननदरात घट घडून येण्याकडे दिसणारी ही प्रवृत्ती भूभागनिहाय निरनिराळी दिसत असल्यामुळे, पुढील पाऊण शतकादरम्यान, लोकसंख्यावाढीचे जगाच्या निरनिराळ्या भागांत दिसू शकणारे संभाव्य चित्रदेखील वेगवेगळे असावे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. या बाबतीत आफ्रिका खंडाचे चित्र मात्र लक्षणीयरीत्या भिन्न दिसेल. आफ्रिका खंडातील अंगोला, झांबिया, युगांडा यांसह एकंदर २६ देशांमध्ये २१०० सालादरम्यान लोकसंख्या वाढती राहील. विशेषत:, सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडे वसलेला आफ्रिका खंडाचा जो भूभाग आहे (सब-सहारन आफ्रिका - कॅमरून, नायजेरिया, नायजेर, लिबिया यांचा समावेश असलेला प्रांत) तेथील जननदरामध्येही, येत्या काळात घट जारी राहण्याची प्रवृत्ती दिसते; परंतु, जननदरातील ती कपात मात्र त्या मानाने खूपच कमी वेगाने साकारत राहील. कारण, २०२१

सालासाठीच्या आकडेवारीनुसार, त्या प्रांतातील देशांमधील एकंदर जननदर सरासरीने जागतिक सरासरीच्या दुप्पट, म्हणजे, दर महिलेस चार अपत्ये असा होता. जगातील सर्वाधिक जननदर – दर महिलेस सरासरी सात अपत्ये – मध्य आफ्रिकेतील चाड इथे २०२१ साली होता. जगभरात जन्माला येणाऱ्या (सजीव) बालकांपैकी तब्बल ४१ टक्के अर्भके २०५० सालादरम्यान या प्रांतात पहिला श्वास घेतील असा अभ्यासकांचा अंदाज आहे. तर, २१०० सालादरम्यान हेच प्रमाण उंचावून थेट ५४ टक्क्यांवर पोहोचावे! २०२१ साली एकूणांतील हेच प्रमाण होते २९ टक्के असे. हे संभाव्य चित्र ध्यानात घेता, भविष्यात या पृथ्वीतलावर जन्माला येणाऱ्या बालकांपैकी बहुतांश बालके – एकूणांतील ७७ टक्के इतकी – जगातील अल्प व निम्न–मध्यम उत्पन्न स्तरातील देशांमध्ये जन्माला येतील, हे स्पष्ट होते. उत्तर आफ्रिका आणि मध्य पूर्वेतील देशांचे चित्रही अभ्यसनीय असेच दिसते. जगात २०२१ साली जितकी जीवित बालके जन्माला आली त्यांत या दोन प्रांतांत जन्म घेतलेल्या बालकांचे प्रमाण होते नऊ टक्के असे. हेच प्रमाण २१०० सालादरम्यान ११ टक्क्यांपर्यंत वाढेल असा अंदाज आहे. जगाच्या अति श्रीमंत देशांच्या पट्ट्यातदेखील सर्वसाधारणपणे असाच कल राहील असे दिसते. २०१२ साली या पट्ट्यातील देशांमध्ये जगभरातील जीवित बालकांपैकी आठ टक्के बालके जन्माला आलेली होती. २१०० सालापर्यंत याच प्रमाणात अंमळ वाढ घडून येऊन ते १० टक्क्यांवर पोहोचले असेल, अशी शक्यता वर्तविण्यात येते.

लोकसंख्येमध्ये नैसर्गिकरीत्याच घट होण्याच्या पर्वात बव्हंश जागतिक समुदाय आता प्रवेशत आहे, हाच या साऱ्या अभ्यासांचा इत्यर्थ. घटत्या जननदराच्या कलाचा थेट व निकट संबंध आहे तो सरासरीने एकंदर कमी अपत्येच जन्माला घालण्याकडे कुटुंबसंस्थांच्या वाढत चाललेल्या प्रवृत्तीचा. ही प्रवृत्ती मूळ धरण्यास कारणभूत होत असलेले घटक विविध प्रकारचे असले तरी, त्यांतल्या त्यांत, त्या संदर्भात अधिक कळीचे ठरताना दिसतात ते सामाजिक घटक. जीवनाकडे, 'करिअर'कडे आणि मुख्यत: कुटुंबसंस्थेकडे बघण्याच्या महिलांच्या पारंपरिक दृष्टिकोनात अतिशय झपाट्याने घडून येत असलेल्या सूक्ष्म परिवर्तनाचा यात अतिशय मोठा भाग दिसतो. सर्वंकष आर्थिक तसेच सामाजिक प्रगतीपायी कुटुंब तसेच समाज अशा दोन्ही प्रांतांत स्त्रियांचा सामाजिक दर्जा आणि निर्णयप्रक्रियेतील त्यांच्या सहभागाचा पोत अलीकडील काळात निर्णायकरीत्या पालटलेला आहे. कुटुंबाचे भरणपोषण आणि मातृत्व यांपेक्षाही स्वातंत्र्याची आणि आर्थिक स्वायत्ततेची महत्ता

स्त्रियांमध्ये त्यांमुळे वाढत्या प्रमाणात स्थिरावते आहे. उच्च शिक्षणाच्या संधींमध्ये घडून आलेली वाढ आणि उच्च शिक्षणाकडे महिलांचा वाढत राहिलेला कल यांचा लक्षणीय हातभार स्त्रियांच्या या बदलत्या मानसिकतेला लाभतो आहे. मुलींच्या शिक्षणसाठी शासनसंस्थाही आता अधिक आक्रमकपणे नानाविध योजना आखून त्यांची तामिली कठोरपणे करत असल्याचे आपण अनुभवतो आहोत. महिलांच्या, उच्च शिक्षणाकडे वाढत असलेल्या कलाचे सामाजिक स्तरावर दोन ठळक परिणाम दिसतात. एक म्हणजे, त्यांपायी लग्नाचे सरासरी वय वाढते आहे. तर, दुसरीकडे स्त्रियांचा श्रमदलातील सहभागही चढते प्रमाण दर्शवतो. लग्न शक्यतोवर लांबणीवर टाकण्याकडे यांमुळे महिलांचा कल वाढताना दिसतो.

स्त्रियांच्या अर्थकारणातील वाढत्या सहभागाला आणखी एक परिमाण आपसूकच जोडले जाते. आणि ते म्हणजे 'करिअर ग्राफ' अधिकाधिक व उत्तरोत्तर चढता राखण्याच्या प्रेरणेचे. उत्पादन प्रक्रियेचे बदलते स्वरूप, माहिती-तंत्रज्ञान तसेच माहिती-तंत्रज्ञानाधारित सेवाक्षेत्राचा वाढता विस्तार, वित्तसेवा-बँकिंग-सल्लासेवा-आरोग्यसुविधा-करमणूक-हॉटेल्स व रेस्टॉरन्ट्स्-वकिली-लेखापरीक्षण-पर्यटन-कुरिअर सेवा-दळणवळण-संवाहन-अन्नप्रक्रिया..यांसारख्या, मुख्यत: महिलांच्या ठायी वसणाऱ्या निसर्गदत्त क्षमतांची व कौशल्यांची मागणी करणाऱ्या उद्योगक्षेत्रांचा झपाट्याने होत चाललेला वाढविकास... यांद्वारे महिलांना अधिकाधिक प्रमाणात रोजगाराच्या वैविध्यपूर्ण संधीदेखील खुल्या होत आहेत. परिणामी, लग्नानंतर अपत्यसंभवदेखील शक्यतो लांबविण्याकडे स्त्रियांची मानसिकता कलताना दिसते. कुटुंबनियोजनाच्या संकल्पनेचा सतत होत राहिलेला स्वीकार आणि कुटुंबनियोजनाच्या साधनसुविधांची सुलभ उपलब्धता या दोहोंपायी अपत्यसंभव लांबविण्याच्या मनोदयांना हातभारच लागतो.

जोडीदाराकडून असणाऱ्या अपेक्षांच्याबाबतीतही महिलाविश्वात आता नवीन ऊर्मी व प्रेरणा उमलताना दिसतात. नवऱ्याकडून आर्थिक आधाराची पूर्वापार असणारी अपेक्षा आता वेगाने उतरणीस लागलेली आहे. मनपसंत जोडीदार भेटलाच नाही तर, प्रसंगी, अविवाहित राहण्याचा पर्याय स्वीकारणाऱ्या महिलांचे प्रमाण सर्वत्रच वाढते आहे. लग्नानंतरही, समजा, जोडीदारासमवेत मने जुळली नाहीत अथवा पटले नाही तर फारसा वेळ न घालवता विभक्त होण्याचा निर्णयही वेगाने अंमलात आणला जातो. जननदर घटविण्यास हे बदलते कलही हातभार लावत आहेत. लग्नानंतर मुले होऊ देण्याचा निर्णय घेतलेल्या अथवा घेणाऱ्या जोडप्यांची मानसिकता

आता मुलांची संख्या मर्यादितच ठेवण्याकडे प्रकर्षाने वळते आहे. मुलांच्या संगोपनाचा वाढता खर्च हा या संदर्भातील एक अतिशय प्रभावशाली घटक आता ठरतो आहे.

घटत्या जननदराला केवळ हे सामाजिक बदलच काय ते कारणभूत आहेत, असेही म्हणता येत नाही. बदलत्या आर्थिक वास्तवाचादेखील तितकाच सहभाग यात आहे. सर्वसाधारण आर्थिक विकासाद्वारे आर्थिक स्वायत्तता हस्तगत करण्याच्या संधी सगळ्यांनाच एकीकडे वाढलेल्या असल्या तरी, त्याच वेळी, दुसरीकडे अर्थकारणातील अनिश्चिततादेखील तितकीच सघन बनते आहे. उत्तरोत्तर भांडवलसघन बनत चाललेली उत्पादनतंत्रे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या नवतंत्रांनी आरंभलेली मुसंडी यांपायी चांगल्या, दर्जेदार व उत्पादक स्वरूपाच्या रोजगार संधी आकुंचन पावत आहेत. वाढत्या स्पर्धेपायी आर्थिक विश्वातील अनिश्चिततादेखील वाढते आहे. अगदी विकसित देशांमध्येही सामाजिक सुरक्षेचे कवच वेगाने विरळ बनत चाललेले आहे. अशा परिस्थितीत, अपत्य जन्माला घालणे ही विवाहितांच्या लेखी एक मोठी जोखीमच शाबीत व्हावी, हे ओघानेच येते. दुसरीकडे, शिक्षणावरील वाढता खर्च, आरोग्यविषयक बाबींशी निगडित खर्च यांत सातत्याने वाढ होतेच आहे. बालसंगोपनासाठी बाळाच्या आईने नोकरी सोडून घरी बसणेदेखील आता परवडेनासे झालेले आहे. उच्च शिक्षण तसेच व्यवसाय व उद्योगाच्या संधी विस्तारत चालल्याने केवळ अपत्यप्राप्तीसाठी श्रमदलात भरती न करण्याचा 'संधी खर्च' (अपॉर्च्युनिटी कॉस्ट) महिलांच्या लेखी वाढतो आहे. तिसरीकडे, वेगाने हातपाय पसरणाऱ्या नागरीकरणापायी निवासी घरांच्या किमती व घरभाडी यांतही प्रचंड वाढ होते आहे. परिणामी, लग्न शक्यतो लांबणीवर टाकणे अथवा लग्न झाल्यानंतर अपत्यसंभव लांबवणे किंवा मातृत्व टाळण्याकडे जोडप्यांची प्रवृत्ती बळावते आहे. या सगळ्याचा प्रभाव एकंदर जननदरावर पडणे स्वाभाविक आहे. हाच कल येत्या काळातही, जगात सर्वत्रच कमी-अधिक प्रमाणात - असाच राहील, अशी चिन्हे आज दिसत आहेत.

झपाट्याने विस्तारणारे शहरीकरण, महिलांचा उच्च शिक्षणातील वाढता सहभाग, अर्थकारणात महिलांचे वाढत असलेले योगदान, कुटुंबासहित सर्वत्रच एकंदर निर्णयप्रक्रियेमध्ये स्त्रियांना लाभत चाललेले त्यांचे रास्त स्थान...या सगळ्या बाबी सर्वसाधारण सामाजिक प्रगतीच्या आघाडीवर अतिशय संतोषजनक अशाच ठरतात. परंतु, या प्रक्रियेची एकंदर जननदर घटण्यामध्ये जी परिणती घडून येते आहे तिच्यापायी काही गंभीर स्वरूपाच्या नवीनच समस्या मानवसमूहाच्या पुढ्यात येत्या काळात

उभ्या ठाकतील, असा इषाराही या क्षेत्रातील अभ्यासक आजच देत आहेत. या समस्यांची उचित अशी दखल घेणारी धोरणप्रणाली अंगीकारणे व तिची काटेकोर अंमलबजावणी करत राहणे, ही सर्वच शासनसंस्थांची जबाबदारी ठरते. जगाच्या ज्या पट्ट्यात, २१०० सालापर्यंत अथवा त्या नंतरही काही काळ, एकूण जननदरामध्ये त्या मानाने फारशी कपात/घसरण संभवत नाही तिथे लोकसंख्यावाढ सातत्यशील राहावी, हे सूर्यप्रकाशाइतके शक्य आहे. खास करून आफ्रिका खंडातील, मुळातच आर्थिक-सामाजिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये मागे पडलेल्या, देशांच्या पुढ्यात त्यांमुळे उग्र प्रश्न उभे ठाकतील. बालमृत्यूंच्या दरात कपात घडवून आणणे, उपासमार रोखणे, गरिबीच्या प्रमाणात घट साध्य करणे, पिण्यायोग्य पाणी, परवडण्याजोगा निवारा, शुद्ध हवा आणि उत्पादक स्वरूपाचा रोजगार यांसारख्या बाबींवर संबंधित देशांना येत्या काळात धोरणांचा झोत स्थिर राखावा लागेल. त्यासाठी पुरेशा निधीची तरतूददेखील सातत्यशील राखणे भाग आहे. दुसरीकडे, मुलींच्या शिक्षणावर भर देणे, कुटुंबनियोजनाच्या सुविधांचा प्रचार-प्रसार व उपलब्धता जारी राखणे यांसारख्या आघाड्यांवरदेखील नेटाने प्रयत्न जारी राखणे गरजेचे ठरेल. पर्यावरणीय बदलांपायी जी नवनवीन आव्हाने मानवजातीच्या पुढ्यात उभी ठाकत आहेत त्यांचे प्रतिकूल फटके समाजव्यवस्थेतील दुर्बळ घटकांना बसू नयेत यांसाठीही शासनयंत्रणांना दक्ष राहणे भाग पडेल. पुढील पाऊण दशकादरम्यान जगातील ज्या भूपट्ट्यात लोकसंख्येमध्ये भरीव वाढ संभवते तिथे यासारखी धोरणे किती प्रभावीपणे राबविली जातात त्यांवर बरेच काही अवलंबून राहील.

याच्या बरोबर विरुद्ध दिशेने धोरणप्रणाली राबवावी लागेल ती जिथे आजच एकंदर जननदर हा 'फर्टिलिटी रिप्लेसमेन्ट रेट'पेक्षाही खाली घसरलेला आहे, अशा भूप्रदेशांत. विवाहित कुटुंबांनी अपत्यांची संख्या मर्यादित करू नये यासाठी त्यांना


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**नियामक मंडळ**

१. **प्रा. डॉ. एस. श्रीरामन** (अध्यक्ष)
२. **प्रा. डॉ. रवींद्र ढोलकिया**
३. **प्रा. डॉ. सुरिंदरसिंग जोधका**
४. **डॉ. रमानाथ झा**
५. **प्रा. डॉ. सुहास पळशीकर**
६. **प्रा. डॉ. अंजली राडकर**
७. **श्री. अभय टिळक** (मानद संचालक)

अर्थसाह्यासह अन्य सवलती बहाल करणे, स्त्रियांचा श्रमदलातील सहभाग वाढावा यासाठी प्रयत्नशील राहत असतानाच प्रसूतीशी संलग्न सेवा, सुविधा (उदाहरणार्थ, बाळंतपणादरम्यान पगारी रजा) उपलब्ध करून देणे, अपत्यप्राप्तीनंतर त्या महिलेचा श्रमदलातील पुनर्सहभाग सुकर व्हावा यासाठी अनुरूप असे कामगार कायदे राबविणे, बाळसंगोपनासाठी रजा घेतलेल्या उच्चपदस्थ महिलांचा त्यांच्या नोकरीच्या ठिकाणी असणारा सेवाज्येष्ठतेचा हक्क अबाधित राखणे...अशा प्रकारच्या प्रेरक तरतुदींची योजना संबंधित देशांमध्ये दक्षतेने अंमलात आणावी लागतील. मुख्य म्हणजे, जननदर घटता राहिल्याने सुदूर भविष्यात ज्या देशामधील श्रमांच्या बाजारपेठेत कर्त्या हातांचा तुटवडा भासू लागल्यास व लागेल तेव्हा अन्य देशांमधून तिथे स्थलांतर करणाऱ्या अथवा करू इच्छिणाऱ्या होतकरू स्थलांतरितांसाठी स्वागतशील, उदार असे धोरण संबधित देशांनी अंगीकारणे या संदर्भात अधिक कळीचे ठरते व ठरेल.

सातत्याने घटत्या जननदराला पायबंद घालण्यासाठी आखलेल्या उपाययोजनांचे व्यवहारातील अपेक्षित परिणाम दिसण्यास चांगल्यापैकी मोठा काळ जावा लागतो. त्यामुळे, या आघाडीवर आजच सक्रिय बनणे हे एकंदरच वैश्विक मानवसमूहाच्या दृष्टीने केवळ हिताचेच नव्हे तर आवश्यक ठरते.

■■

***(पान ४ वरून)*** नागरिकदेखील बिनदिक्कदतपणे मनाशी जपत राहतात. प्रातिनिधिक लोकशाहीचे जे प्रारूप आपण निवडलेले आहे त्यांत, आपण निवडून दिलेले प्रतिनिधी सभागृहात आपल्या कल्याणाचे विषय मांडतात अथवा नाही, हे चिकित्सकपणे निरखून त्यांनुसार त्यांना जाब विचारणे, हे नागरिकांचे, वस्तुतः, कर्तव्य ठरते. परंतु, त्यासाठी, मुदलात, चिकित्सकपणे विचार करण्याची संस्कृती समाजव्यवस्थेमध्ये रुजवून जोपासावी लागते. लोकशाही राज्यव्यवस्थेचा निव्वळ सांगाडा मिरवत प्रजासत्ताकाच्या सत्वाशी बेइमानी करणारी राजवट नांदती ठेवण्यात रस असलेल्या प्रवृत्ती, मुळात, अशी चिकित्सक विचारसरणी समाजात बळकट होऊच नये, याची खबरदारी घेत असतात. जगाच्या पाठीवर आज कार्यरत असणाऱ्या अनेक लोकशाही देशांमधील कटू वास्तव नेमके असेच काहीसे आहे.

संविधानाच्या स्वीकाराचे अमृतमहोत्सवी वर्ष सरत असताना अशा काही संवेदनशील पैलूंना उजाळा मिळून त्यांबाबत सजग चर्चा व विचारविनिमय घडावा, इतकीच माफक अपेक्षा!

■■

# पर्यावरण

## दुर्मिळ बगळ्यांच्या रक्षणाचे आव्हान

पर्यावरणाशी संबंधित अनेकानेक आव्हाने आपल्या पुढ्यात आजघडीला उभी ठाकलेली आहेत. त्यामध्ये एक महत्त्वाचे आव्हान आहे ते म्हणजे दुर्मिळ होत चाललेल्या पक्ष्यांच्या प्रजातींना वाचवण्याचे. आजच्या घडीला जागतिक स्तरावर झालेल्या अभ्यासातून जी ताजी आकडेवारी २०२४ साली समोर आलेली आहे त्यानुसार, जगभरात विविध प्रकारच्या पक्ष्यांच्या ११ हजारांहून अधिक प्रजाती अस्तित्वात आहेत. मात्र, चिंतेची बाब अशी की, या पैकी जवळपास १४०० हून अधिक प्रजाती आजच्या घडीला धोक्यात आहेत. या प्रजातींमधील पक्ष्यांची संख्या झपाट्याने कमी होत चालली असून त्या लुप्त होतील अशी भीती पक्षीतज्ज्ञांकडून व्यक्त केली जाते आहे. धोक्याच्या सावटाखाली असणाऱ्या प्रजातींचे प्रमाण एकूण ज्ञात प्रजातींमध्ये ११ टक्के इतके भरते.

'बर्डलाइफ डेटा झोन'च्या माध्यमातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, ज्यांच्या अस्तित्वाला येणाऱ्या काळात धोका निर्माण होऊ शकतो अथवा धोका आहे अशा प्रजातींच्या यादीत ज्यांचा समावेश होऊ शकतो अशा पक्ष्यांच्या एकूण ९९१ प्रजाती आहेत. अलीकडेच केलेल्या एका पाहणीनुसार जी आकडेवारी समोर आलेली आहे ती चिंतेत अधिकच भर टाकणारी आहे. त्या नुसार, गेल्या काही वर्षांमध्ये पक्ष्यांच्या विविध प्रजातींची संख्या घटत असून एकूण प्रजातींपैकी ६१ टक्के प्रजाती तर अशा आहेत की ज्यांची एकूण संख्या कमी होत चालली आहे. हे प्रमाण २०१६ साली ४४ टक्के इतके होते. याचा अर्थ पक्ष्यांची एकूण संख्या घटण्याचे प्रमाण सातत्याने वाढते आहे. बेसुमार वृक्षतोड, जंगलातील घुसखोरी, कृषिक्षेत्राचा विस्तार, वाढते उद्योगधंदे आणि विस्तारणारी मानवी वस्ती अशा विविध कारणांमुळे ही संख्या कमी होत चालली असल्याचे पक्षीतज्ज्ञांचे निरीक्षण आहे.

अमेरिका, पश्चिम आफ्रिका, मादागास्कर, आग्नेय आशिया हे भाग पक्ष्यांच्या अधिवासाच्या दृष्टीने अलीकडच्या काळात धोक्याची ठिकाणे बनत चालली आहेत. कारण तेथील जंगले आणि नैसर्गिक परिसंस्था मोठ्या प्रमाणावर नष्ट होत चालल्या असल्याने पक्ष्यांच्या विविध प्रजातींवरही त्याचा परिणाम होतो आहे. असाच एक दुर्मिळ होत चाललेला पक्षी सध्या पक्षीतज्ज्ञांच्या काळजीत भर घालतो आहे. तो म्हणजे, White bellied Heron (पांढऱ्या पोटाचा बगळा). जगभरातील बगळ्यांपैकी हा दुसऱ्या क्रमांकाचा मोठा बगळा आहे. परंतु, दुर्दैवाची बाब अशी की आजमितीला संपूर्ण जगभरात या प्रजातीमधील केवळ ६० पक्षीच काय ते जिवंत आहेत!

International Union for Conservation of Nature (IUCN) या संस्थेने केलेल्या वर्गीकरणानुसार, नामशेष होण्याच्या मार्गावर असलेला पक्षी म्हणून या बगळ्यांच्या प्रजातीकडे पाहिले जाते आहे. तीन-साडेतीन किलो वजन असलेल्या या बगळ्याची उंची १२७ सेंटीमीटर इतकी असते. चीन, नेपाळ, भारत, भूतान, म्यानमार आणि बांगलादेशात पूर्वी आढळून येणारा हा पक्षी आता केवळ भूतान आणि म्यानमारच्या उंच पर्वतांमध्ये दिसून येतो. या प्रजातींच्या अधिवासाचा होत गेलेला ऱ्हास आणि त्यांची मोठ्या प्रमाणावर होणारी शिकार यामुळे हे बगळे चीन, नेपाळ आणि बांगलादेशातून लुप्त झाले असावेत असा पक्षीतज्ज्ञांचा दावा आहे.

सर्वसाधारपणे White bellied Heron हे पक्षी जलद वाहणाऱ्या हिमालयीन गोड्या पाण्यातील नदीकाठच्या भागात आढळून येतात. या बगळ्यांच्या प्रजननाचा हंगाम जानेवारी ते जूनपर्यंत असतो. मात्र, हे पक्षी एकांतात राहणे पसंत करतात. ते इतर पक्ष्यांमध्ये फारसे मिसळत नाहीत. हे पक्षी नदीजवळ असलेल्या उंच झाडांवर अंडी घालतात. वर्षातून केवळ दोन किंवा चार अंडी ते देतात. हे बगळे स्थलांतरित होत नाहीत. परंतु प्रजननानंतर ते दलदलीच्या भागात जाऊन राहण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे भारतामध्ये आसाम आणि अरुणाचल प्रदेश याच दोन भागांत हे पक्षी मुख्यत्वे आढळून येतात. या बगळ्यांची भारतातील संख्या जेमतेम १५ ते २० च्या दरम्यान असावी असा अभ्यासकांचा अंदाज आहे. भूतानमध्ये भारतापेक्षा थोडेफार जास्त बगळे असतील. तिथे या बगळ्यांवर बराच अभ्यास झालेला आहे.

भूतानमध्ये White bellied Heron च्या अभ्यासासाठी आणि त्यांची संख्या वाढावी म्हणून White-bellied Heron Conservation Center हे एक संवर्धन केंद्रदेखील सुरू करण्यात आले आहे. त्यासाठी त्यांनी अभ्यासक व शास्त्रज्ञांचा एक

स्वतंत्र चमू नियुक्त केलेला आहे. या बगळ्यांनी अंडी दिल्यानंतर त्यातून बाहेर येणाऱ्या पिल्लांना पंख येण्यापूर्वी ती पिल्ले या केंद्रात आणली जातात आणि तिथे शास्त्रशुद्ध पद्धतीने त्यांचे संगोपन केले जाते. त्यामुळे ही पिल्ले जगण्याची शक्यता वाढते. इथे या बगळ्यांना सुरक्षित वातावरण मिळेल, त्यांचे नीट संगोपन करता येईल आणि त्यांना पुन्हा सुरक्षित अशा अधिवासात सोडता येऊ शकेल असा त्यामागचा खरा हेतू आहे. या पक्ष्यांचा जनुकसाठा संकलित करणे, या बगळ्यांच्या संख्येत वाढ घडवून आणणे, त्यांचे प्रजनन करणे हे या संवर्धन केंद्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या शिवाय, या विषयावर अधिक संशोधन करणे, लोकांना प्रशिक्षित करणे आणि या विषयाबाबत लोकांच्या मनात जागरुकता निर्माण करणे, पक्ष्यांची संख्या अधिकाधिक वृद्धिंगत व्हावी यासाठी योगदान देणे अशा विविध पैलूंसंदर्भात हे केंद्र जागतिक पातळीवर काम करते. स्वतंत्रपणे अंडी उबवण्यासाठी या केंद्राने घरटी तयार केली. २०२१ साली त्यामध्ये चार अंडी प्रथमच यशस्वी रीतीने उबवण्यात आली होती. या White-bellied Heron या पक्ष्यांची संख्या वाढवण्यासाठी आणि प्रजननासाठी हे केंद्र करीत असलेले काम खूप महत्त्वाचे आहे. या स्वरुपाचे काम करणारे हे जगातील पहिलेच कायमस्वरुपी केंद्र आहे. बगळ्यांच्या तीन जोड्या या केंद्रात २०२१ साली ठेवण्यात आलेल्या होत्या. अशाच स्वरूपाचे एखादे केंद्र भारतातही सुरू करणे गरजेचे आहे, अशी भूमिका अभ्यासकांकडून आग्रहाने मांडली जात आहे. या बगळ्यांवर अधिक संशोधन होणे गरजेचे असून ते नामशेष होण्यापासून वाचावेत म्हणून विशेषत्वाने प्रयत्न करणे निकडीचे आहे.

बंगळुरूमधील Nature Conservation Foundation या संस्थेत कार्यरत असणाऱ्या संशोधकांनी White-bellied Heron या बगळ्यांवर मौलिक संशोधन केले आहे. त्यासाठी अनेक वर्षे अरुणाचल प्रदेशात त्याचे संशोधन जारी होते. प्रामुख्याने नामदफा आणि कमलांग येथील व्याघ्र प्रकल्पात असलेल्या नद्यांवरच हे पक्षी येतात असे त्यांनी संशोधन व अभ्यासातून सिद्ध केले होते. याच चमूतील एक महत्त्वाचे संशोधक डॉ. हिमाद्री मंडल यांनी तर White-bellied Heron या बगळ्यांवर डॉक्टरेटसुद्धा प्राप्त केली आहे. स्थानिक लोकांचे सहकार्य घेऊन त्यांनी या पक्ष्यांच्या संदर्भात अतिशय मौलिक असा अभ्यास करून आपला संशोधन प्रबंध सादर केला होता. हे बगळे नेमके कुठे आढळतात, ते कोणत्या प्रकारचे मासे खातात, कोणत्या वेळेला ते मासे खाण्यासाठी येतात, त्यांची संख्या किती आहे या सगळ्या बाबी त्यांनी आपल्या अभ्यासातून मांडल्या.

या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या प्रतिपादनानुसार, पक्ष्यांचे संरक्षण आणि पर्यावरण धोरण यांचा सर्वंकष विचार आता होणे गरजेचे आहे. काही विशिष्ट प्रजातींपुरता विचार करून चालणार नाही. त्यासाठी विविध प्रजातीच्या पक्ष्यांचा अधिवास, जंगल आणि भूमीचा वापर यावर जागतिक स्तरावर एकत्रितपणे आणि समन्वयाने काम होणे गरजेचे आहे. मासे पकडण्याच्या पारंपरिक पद्धती मागे पडत चालल्या असून आता जाळे टाकून किंवा 'इलेक्ट्रोफिशिंग'सारख्या (माशांना शॉक देऊन मारणे) अशा प्रकारांचा सररास अवलंब होताना दिसतो आहे. त्यामुळेच नद्यांमधील मासेमारीचे वाढते प्रमाण लक्षात घेता तिथे किनाऱ्यावर मासे खाण्यासाठी येणाऱ्या बगळ्यांचे प्रमाणही कमी होत चालले आहे. अधिक प्रमाणात होणारी मासेमारी या बगळ्यांच्या संख्येत घट घडवून आणणारे प्रमुख कारण ठरले आहे असा दावा संशोधक डॉ. हिमाद्री मंडल यांनी आपल्या संशोधनाद्वारे केला आहे. White-bellied Heron या बगळ्यांची नैसर्गिक प्रजननक्षमता कमी आहे त्यामुळे त्यांची संख्या नेहमीच मर्यादित राहिलेली आहे. गेल्या काही वर्षांत त्यांच्यावर जे संशोधन सुरू झाले आहे त्यामुळे त्यांची संख्या घटण्याच्या इतर कारणांचाही शोध लागतो आहे. माणसांचा हस्तक्षेप हे त्यातील एक प्रमुख कारण असल्याचेही समोर आले आहे.

भारतात आसाममधील मानस व्याघ्र संरक्षित क्षेत्र ही जागा या बगळ्यांसाठी सर्वांत सुरक्षित मानली जाते. जैवविविधतेचे हे एक महत्त्वाचे केंद्र असून या ठिकाणी White-bellied Heron या प्रजातीचे बगळे सुरक्षित राहू शकतात असा अभ्यासकांचा दावा आहे. या बगळ्यांविषयी लोकांमध्ये असणारे अज्ञान लक्षात घेता त्यांच्याविषयी शालेय स्तरापासून मुलांना माहिती देणे व लोकांमध्ये त्या विषयी जागरुकता निर्माण करणे गरजेचे आहे. या पक्ष्यांचे संवर्धन-संगोपन करण्यासाठी आणि त्यांची शिकार होऊ नये म्हणून स्थानिक परिसरातील युवकांनी जागरुक असणे गरजेचे आहे. त्यासाठी युवकांना पक्षी निरीक्षणाची गोडी लावून त्यांना अशा दुर्मिळ बगळ्यांची व पक्ष्यांची माहिती त्यांना करून देणे गरजेचे आहे त्या दृष्टीने वन विभाग आणि पक्षी संवर्धनासाठी काम करणाऱ्या संस्थांनी एकत्र येऊन पुढाकार घेणे गरजेचे आहे. दरवर्षी White-bellied Heron या बगळ्यांची गणना होणे आवश्यक आहे. अवैध मासेमारी रोखण्याचेही एक मोठे आव्हान आहे. भूतानच्या धर्तीवर अरुणाचल प्रदेशातदेखील White-bellied Heron Conservation Center सुरू करणे गरजेचे आहे. पुढील किमान दहा वर्षांसाठी नियोजनबद्ध प्रयत्न करून ही प्रजाती वाचवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे अन्यथा लुप्त प्रजातींमध्ये ही

आणखी एक प्रजाती आज ना उद्या दाखल होईल, अशी भीती अभ्यासक व्यक्त करीत आहेत.

केवळ White-bellied Heron याच प्रजातीपुरता हा प्रश्न नसून नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या असंख्य प्रजातींना वाचवण्याचे मोठे आव्हान पर्यावरणप्रेमी, पक्षीसंवर्धक आणि अभ्यासक या सगळ्यांच्याच पुढ्यात आहे. आपण किती सजगतेने पावले टाकतो आणि या बाबतीत जबाबदारीने कृतिशील होतो यावरच त्याचे भवितव्य ठरणार आहे, ही जाणीव अभ्यासक करून देत आहेत.

**या अंकातील लेखांचे संदर्भ :**


- Critical Thinking and the Conditions of Democracy, Nicholas C. Burbules, Education Policy Analysis Archives, Volume 31, No. 104 (Special Issue), September 19, 2023.
- https://geiselmed.dartmouth.edu/news/2025/scientists-find-brain-chemical-tied-to-trauma-and-depression-economic-times-health-world/
- https://www.sciencedaily.com/releases/2025/11/251108083902.htm
- https://www.cuimc.columbia.edu/news/brain-chemical-linked-suicide-risk-after-childhood-trauma
- The Great relationship recession : The Economist, November 8th-14th 2025, p.10.
- Falling in love with singlehood : Why single status is on rise ?
- The Growth of One Person Households, by Joseph Chamie.
- The number of single in the U. S. is growing : "What people look for in a romantic partner has changed", says scholar of singlehooe, by Gili Malinsky.
- https://whc.unesco.org/en/list/338/
- https://www.rspnbhutan.org/wp-content/uploads/2023/10/WBH-Brochure_Digital_Original.pdf
- https://threatenedtaxa.org/index.php/JoTT/article/view/2892
- https://geiselmed.dartmouth.edu/news/2025/scientists-find-brain-chemical-tied-to-trauma-and-depression-economic-times-health-world/
- https://www.sciencedaily.com/releases/2025/11/251108083902.htm
- https://www.cuimc.columbia.edu/news/brain-chemical-linked-suicide-risk-after-childhood-trauma
- https://www.bbc.com/news/articles/cwypzdgwg1yo
- https://rainforestfoundation.org/engage/brazil-amazon-fires/
- https://earth.org/up-to-47-of-amazon-rainforest-at-risk-of-collapse-by-mid-century-due-to-unprecedented-stress-from-global-warming-and-deforestation/
- Dramatic declines in global ferility rates set to transform global population pattterns by 2100, The Lancet, 20 March 2024.
- https://whc.unesco.org/en/list/338/.
- https://www.rspnbhutan.org/wp-content/uploads/2023/10/WBH-Brochure_Digital_Original.pdf
- https://threatenedtaxa.org/index.php/JoTT/article/view/2892.


***(उर्वरित संदर्भ पान ४५ पहावे)***

# आर्थिक

## उधारीचा दिवा आणि कर्जांचा राक्षस

कर्जबाजारीपणा ही, पार विस्मरणात जमा न झालेल्या भूतकाळात मुख्यत: तिसऱ्या जगातील गरीब देशांच्या मानगुटीला बसलेली समस्या गणली जात असे. आजचे चित्र असे आहे की, जगातील श्रीमंत देशदेखील कर्जांच्या खाईत बुडालेले आहेत. शेंडीपर्यंतच केवळ नव्हे तर, शेंडी पार दिसेनाशी होईल इतपत! राष्ट्राच्या ठोकळ उत्पन्नापेक्षाही अधिक कर्जांचा बोजा माथ्यावर वागविणाऱ्या देशांच्या यादीत आजघडीला जपान, इटली आणि फ्रान्ससारखे मातबर देश विराजमान आहेत. तर, देशाच्या ठोकळ उत्पन्नाइतकेच जवळपास कर्ज डोक्यावर चढलेल्या राष्ट्रांच्या यादीत ब्रिटन आणि अमेरिका बसलेले दिसतात. विकसित देशांच्या गटाचा एकत्रित विचार केला तर, एकंदर ठोकळ कर्जांचे देशांच्या ठोकळ उत्पादनाशी असलेले सरासरी प्रमाण आज ११० टक्क्यांच्या घरात भरते. कर्जाऊ घेतलेल्या रकमांच्या बळावरच, १८१५ साली, ब्रिटनने बलाढ्य जगज्जेता गणल्या जाणाऱ्या नेपोलिअनचा पराभव केला होता. त्यांमुळे, एका इतिहासकाराने, ब्रिटनच्या तशा उधारी करण्याला, लोककथांमधील अल्लादीनच्या दिव्याची उपमा दिलेली होती.

दिवा घासला की त्यांतून प्रगट होऊन अल्लादीनची त्या क्षणीची इच्छा पूर्ण करणाऱ्या राक्षसाच्या दंतकथा ऐकतच आपण मोठे झालेलो असतो. अगदी त्याच धर्तीवर, निधीची गरज भासली रे भासली की उधारीरूपी दिवा घासण्याचा परिपाठ सगळे श्रीमंत देश २००८ सालापासून मनोभावे जपत आलेले आहेत. तो दिवा घासघासून त्यांतून जन्माला घातलेला कर्जांचा राक्षस आज त्याच सगळ्या ऋणको देशांच्या पुढ्यात अक्राळविक्राळ जबडा पसरून भेसूर रूपात उभा ठाकलेला आहे. देशोदेशींच्या मध्यवर्ती बँकांनी २०२२ सालानंतर अवलंबलेल्या पैसा धोरणाचाही हातभार, काही प्रमाणात, या संकटाला लागलेला आहे. महागाईला लगाम घालण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, देशोदेशींच्या मध्यवर्ती बँकांनी २०२२ सालानंतर,

कठोर पतधोरणाचा अंमल जारी करण्याची पावले उचलली. साहजिकच, व्याजदरांची सरासरी पातळी त्यांमुळे उंचावू लागली. शासनसंस्थांनी उचललेल्या कर्जांवरील व्याजांची देय रक्कम फुगायला लागली हा, पैसा धोरणाच्या बदललेल्या दिशेचा एक स्वाभाविक परिणाम ठरतो. आता, इथे एक गंमत आहे. अनेक देशांमध्ये महागाईचा तेवर चढायला लागला त्यालादेखील, काही अंशी का होईना पण, शासनसंस्थांनी सढळ हातांनी सरकारी खर्चामध्ये घडवून आणलेली घसघशीत वाढच कारणीभूत होती.

अल्लादीनच्या गोष्टीतील राक्षस दिव्यातून प्रगट झाला की अल्लादीनच्या मनीषा आज्ञाधारकपणे पूर्ण करत असे. परंतु, उधारीरूपी दिव्यामधून निपजलेला हा कर्जांचा राक्षस मात्र पुराणांतरीच्या भस्मासुराप्रमाणे त्या त्या देशांच्या अर्थव्यवस्थांच्या टाळूवर हात ठेवून त्यांचा घास घेण्यासाठी जणू सरसावल्याचे भासते आहे. परंतु, गंमत अशी आहे की, या संदर्भात सक्रिय बनत वाढत्या तुटीला परिणामकारक आळा घालण्याच्या मानसिकतेमध्ये आज कोणीच दिसत नाही. देशोदेशींच्या अर्थतज्ज्ञांना सर्वाधिक अचंबा जर कोणत्या गोष्टीचा वाटत असेल तर ती गोष्ट हीच होय. बरे, ही केवळ आजघडीची तात्पुरती अथवा तात्कालिक म्हणून संभावना करता येण्याजोगी बाब अजिबात नव्हे. कारण, अनेक विकसित देशांमध्ये खर्चाच्या एका मागोमाग एक अशा लाटाच जणू येत्या काळात निर्माण होण्याच्या बळकट शक्यता आजच दिसत आहेत. त्या लाटांच्या मुळाशी असलेली कारणेदेखील पुन्हा तात्पुरती म्हणता येण्याजोगी नाहीत. ती कारणे आहे निखळ संरचनात्मक (स्ट्रक्चरल) स्वरूपाची. म्हणजे, त्यांना बगल देता येईल अशी परिस्थिती अजिबातच नाही. त्यांमुळे, विकसित देशांच्या तिजोरीतील तूट आणि परिणामी करावी लागणारी कर्जउभारणी हा चक्रनेमिक्रम असाच चालू राहील अथवा राहणार का, असा प्रश्न अर्थाभ्यासकांना आज छळतो आहे.

अर्थात, हे सगळे अंदाज आहेत. परंतु, यांतही एक गोम आहे. ती अशी की, शासकीय तिजोरीतील भविष्यकालीन तुटीबाबतचे अंदाज हे वर्तमानातील परिस्थिती आणि भूतकालीन कल यांच्या पायावरच वर्तवले जातात. असे अंदाज, बहुतांश, नेमस्त व सकारात्मक असतात. त्यांमुळे, साहजिकच त्यांत, अवचितच उद्‌भवणाऱ्या अरिष्टांची दखल घेतली जाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मग, ‘कोविड-१९’सारखी एखादी आपत्ती अवचितच निर्माण झाली की शासनसंस्थेचा महसूल, खर्च आणि सरकारी तूट या संदर्भातील सगळेच अंदाज सपशेल फसतात. असे असल्याने,

विकसित अर्थव्यवस्थांच्या माथ्यावरील कर्जांचे चित्र, आज वर्तविण्यात येत असलेल्या अंदाजांपेक्षा, उद्या प्रत्यक्षात निराळेच अवतरले तर काय, अशी सार्थ भीतीदेखील धोरणकर्त्यांना सतावत राहते.

जगात सर्वत्रच, आणि खास करून युरोपातील प्रगत, श्रीमंत देशांमध्ये, लोकसंख्येचे सरासरी वयोमान झपाट्याने वाढते आहे. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर, भविष्यात देशोदेशी ज्येष्ठ नागरिकांचे एकंदर लोकसंख्येतील प्रमाण सतत वाढतच जाणार आहे. आर्थिक आघाडीवर या संभाव्य वास्तवाचे दोन मुख्य परिणाम स्पष्ट आहेत. एक म्हणजे, युरोपातील अनेक देशांमधील श्रमदलांत तरूण व कर्त्या हातांची या पुढे सतत वानवा भासत राहील. त्याचे परिणाम उत्पादनापासून ते करसंकलनापर्यंत सर्वत्र जाणवतील. दुसरे म्हणजे, वयोवृद्ध नागरिकांचे प्रमाण एकंदर लोकसंख्येमध्ये चांगले भरभक्कम बनल्याने निवृत्तिवेतनादी सामाजिक सुरक्षेचे कवच आणि आरोग्यसुविधांचे बहुपदरी जाळे यांवर पुरेसा खर्च करण्यासाठी शासनसंस्थेला हात सतत ओणवा ठेवणे क्रमप्राप्त ठरत राहील. जगभरात एकंदर सर्वत्रच नांदणारी अशांतता आणि युध्यमान परिस्थिती यांपायी संरक्षणसिद्धतेवरील खर्चास कात्री लावण्याची जोखीम कोणतीही शासनसंस्था स्वीकारणार नाही. आणि तिसरे म्हणजे, पर्यावरणीय बदलांचे जे प्रतिकूल परिणाम येत्या काळात अन्नधान्योत्पादनापासून ते रक्तसंकलनापर्यंत सर्वत्र वाढत्या सघनतेने जाणवतील त्यांचा मुकाबला करण्यासाठी सरकारी खर्चाचे मजबूत संरक्षक चिलखत सतत सज्ज राखावे लागेल.

अशा विविध आघाड्यांवरील संभाव्य आव्हानांना तोंड देण्यासाठी शासनसंस्थांना जी कर्जउभारणी अनिवार्य ठरेल त्यांपायी व्याजांचा बोजा आपसूकच वाढता राहील, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. हे सगळे येत्या काळातील संभाव्य खर्च जमेस धरले तर, युरोपातील प्रगत अर्थव्यवस्थांना त्यांच्या ठोकळ देशी उत्पादनाच्या सरासरी सहा टक्के इतकी वाढीव रक्कम दरवर्षी सतत खर्च करावी लागेल. परंतु, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अदमासानुसार स्पेन, ब्रिटन, पोर्तुगाल व स्वित्झर्लंड या देशांना त्यांच्या ठोकळ देशी उत्पादनाच्या सहा टक्के नव्हे तर सरासरी आठ टक्के इतकी रक्कम दरवर्षी निवृत्तिवेतन तसेच व्याजादीवर कराव्या लागणाऱ्या वाढीव खर्चासाठी सज्ज ठेवणे भाग पडेल. असे सगळे आनुषंगिक खर्च भागवायचे झाले तर, अमेरिकेला, येत्या काळात करमहसूल आणि सरकारी खर्च या दोहोंतही समसमान म्हणजे १५ टक्के इतकी वार्षिक वाढ सातत्यशील राखावी लागेल. कारण, अमेरिकेमध्ये बाहेरून आयात केल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांवरील आयात शुल्कामध्ये ट्रम्प यांनी जारी

केलेल्या जबर वाढीपायी संकलित होणारा वाढीव महसूल, दुसरीकडे, ट्रम्प यांनीच ऐलान केलेल्या करसवलतींमध्ये जिरणार आहे!

जगाच्या विकसित पट्ट्यातील, कर्जांच्या बोज्याखाली दबलेल्या देशांतील धोरणकर्त्यांना, त्यांमुळे एक समस्या सतत छळ आहे. या सगळ्यापायी कर्जांचा भार या पुढे कसा वाढणार आहे, ही काळजी सर्वत्र आहे. कारण, तरूण श्रमशक्तीचे प्रमाण घटत जाण्याचा मोठा परिणाम एकंदर उत्पादन, मागणी आणि पर्यायाने करसंकलन या सगळ्यांवरच संभवतो. करमहसुलातील वाढीच्या पायात बेड्या पडणे आणि दुसरीकडे ज्येष्ठांच्या आरोग्यसंलग्न सुविधा, निवृत्तिवेतने व सामाजिक सुरक्षेचे कवच या तीन बाबींपायी खर्चाची मात्रा मात्र वाढती राहणे, या विषम स्पर्धेचा सामना करणे सगळ्यांनाच भाग पडणार आहे. यामुळे शासनसंस्थेच्या तिजोरीतील तुटीची दरी रुंदावत राहून ती भरून काढण्यासाठी कर्जउभारणीचे सत्र चालूच ठेवावे लागेल. सातत्यशील तुटीपायी महागाईच्या सर्वसाधारण दराला खतपाणी मिळण्याबरोबरच कर्जाऊ रकमांवरील व्याजाचा आकारही वाढता राहतो. परिणामी, शासनसंस्थेच्या महसूली खर्चात वाढ होत राहते. स्वाभाविकपणेच, सरकारी खर्चाची एकंदर गुणवत्ता खालावते. एकंदर खर्चाला लगाम लावण्याकडे शासनसंस्थेचा कल वळला की पहिली कात्री चालवली जाते ती भांडवली खर्चावर. भांडवली खर्चाकडे हात आखडता घेतला गेला की, अर्थव्यवस्थेतील उत्पादनक्षमतेचे कुपोषण चालू होते. परिणामी, ठोकळ उत्पादनवाढीचा वेग अडखळतो. त्यांतून निष्पन्न होते बेरोजगारीची समस्या... आणि हे दुष्टचक्र मग स्वयंगतीने चालत राहते. या सगळ्याचे परिणाम भोगणे त्या त्या समाजातील येणाऱ्या पिढ्यांना क्रमप्राप्त बनते.

वैश्विक समूहाची एकंदरीने उतारवयाकडे आता चालू झालेली वाटचाल जगभरातील सर्वच शासनसंस्थांच्या खर्चाचा आकृतिबंध येत्या काळाात पुरता पालटून टाकील, हाच या सगळ्याचा मथितार्थ. परंतु, ही केवळ आजच एकाएकी जाणवलेली गंभीर बाब होय, असेही अजिबात नाही. ज्येष्ठ नागरिकांसाठी निवृत्तिवेतनादी वित्तीय तरतुदी, वयोवृद्धांसाठी आवश्यक त्या आरोग्यविषयक सुविधांची पुरेशी व्यवस्था यांसाठी कराव्या लागणाऱ्या शासकीय खर्चामध्ये १९८०च्या दशकापासूनच दरसाल वाढ घडून येऊ लागलेली आहे. ज्येष्ठांना पुरेशा आरोग्यसुविधा पुरविण्यासाठी, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अभ्यासानुसार, श्रीमंत देशांच्या गटाचे सदस्य असणाऱ्या देशांना (ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन ॲन्ड डेव्हलपमेन्ट - ओईसीडी) १९८० सालापासून ठोकळ देशी उत्पादनाच्या पाच टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम वेच

करावी लागते  आहे. त्याच अभ्यासानुसार, २०३० सालादरम्यान, वयोवृद्धांसाठी निवृत्तिवेतन आणि आरोग्यसुविधा यांची तरतूद करण्यापोटी, २०२३ सालाच्या तुलनेत, याच गटातील देशांना त्यांच्या देशी ठोकळ उत्पादनाच्या २.४ टक्के इतकी वाढीव रक्कम दरसाल सरासरीने खर्च करावी लागेल.

हे जरी एका बाजूला असे खरे असले तरी, काही अभ्यासक याच नाण्याची दुसरी बाजूदेखील हिरिरीने पुढे आणतात. ज्येष्ठ नागरिकांच्या वाढत्या राहणाऱ्या प्रमाणापायी शासनसंस्थेच्या तिजोरीवरील भार येत्या काळात सातत्याने वाढत राहून तो एक प्रकारचा मोठा व कायमस्वरूपी बोजा ठरेल, असेही मानण्याची गरज नाही. वैद्यकीय उपचारांच्या प्रांतात झालेल्या अप्रतिहत सुधारणा, सरासरीने वाढते उत्पन्न, सर्वसाधारण कल्याणाची उंचावलेली पातळी, सकस आहाराद्वारे लाभणारे पर्याप्त पोषण यांपायी जगभरात सर्वत्रच सरासरी आयुर्मान वाढलेले आहे. परिणामी, तांत्रिकदृष्ट्या निवृत्ती घेतली तरी अर्थपूर्णरीत्या कार्यरत राहण्याचा कार्यकालदेखील सरासरीने वाढतो आहे. वय वाढले तरी ज्येष्ठांची कार्यक्षमता चांगल्यापैकी शाबूत असते. परिणामी, ते अधिक काळ आर्थिकदृष्ट्या सक्रिय राहू शकतात. प्रदीर्घ काळचा व्यावसायिक अनुभव गाठीशी असल्याने ज्येष्ठ नागरिकांची उत्पादकतादेखील चांगल्यापैकी भक्कम असते. तांत्रिक प्रगती आणि पोषक आहार यांपायी मेंदूची कार्यक्षमताही चांगल्यापैकी टिकून राहून उतारवयापायी उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम घडून येण्याच्या शक्यताही मंदावतात. एकंदरीनेच, वाढत्या वयाबरोबर बचतीकडेही वाढता कल राहिल्याने ज्येष्ठ नागरिक संपत्तीचा संचयदेखील चांगल्या प्रकारे करतात. त्यांची हीच बचत अर्थव्यवस्थेमध्ये गुंतवणूकयोग्य भांडवलाचा स्त्रोत बनून राहते. अशा विविध कारणांमुळे, ज्येष्ठ नागरिकांचे वाढते प्रमाण म्हणजे शासकीय तिजोरीवरील वाढता भार असे, काही अभ्यासकांच्या मते, सरळ व सोपे समीकरण मांडणे वस्तुस्थितीला धरून होत नाही. हे स्पष्टीकरण अथवा विश्लेषण तत्त्वश: तर्कशुद्ध आणि म्हणून पटण्यासारखे असले तरी, ज्येष्ठ नागरिकांचे एकंदर लोकसंख्येतील सतत वाढते राहणारे प्रमाण, दीर्घकाळाचा विचार करता, क्लिष्ट अशा काही वित्तीय समस्या पुढ्यात उभे करते, हे निर्विवाद. त्यांचे स्वरूप अर्थ-राजकीय असे आहे.

वयोवृद्ध नागरिकांची मतदानाच्या माध्यमातून प्रगट होणारी संघटित ताकद, हा विकसित व श्रीमंत देशांच्या पुढ्यातील मोठा चिवट आणि जटिल प्रश्न शाबीत होतो आहे. ज्येष्ठांना अदा करावयाच्या सामाजिक सुरक्षांचे तपशील असोत अथवा निवृत्तीच्या वयाशी निगडित काही बदल असोत, देशाच्या वित्तीय स्वास्थ्याच्या

दृष्टीने त्यांत काही आवश्यक ते बदल घडवून आणण्यास ज्येष्ठांचा असणारा सपशेल नकार हे देशोदेशींच्या डाव्या तसेच उजव्या विचारसरणीच्या राजकीय पक्षांच्या लेखी अवघड जागीचे दुखणे ठरते आहे. निवृत्तीच्या वयात बदल घडवून आणण्यासारख्या बदलांना फ्रान्स, इटली, ब्रिटन यांसारख्या देशांतील वयोवृद्धांचा ठाम विरोध आहे. तो विरोध मोडून काढत आवश्यक ते फेरफार पुढे रेटण्याचे धारिष्ट्य कोणत्याही राजकीय पक्षाकडे आजमितीस नाही कारण त्यांपायी वृद्धांची एकगठ्ठा 'व्होट बँक' आपल्याकडे पाठ फिरवून आपल्याला राजकीय विजनवासात धाडेल अशी भीती सगळ्यांनाच वाटते. युरोपातील विविध देशांनी ज्येष्ठांना ज्या काळात निवृत्तिवेतनादी सुविधा जारी केल्या त्या वेळची सर्वसामान्यांची सरासरी आयुर्मर्यादा आणि आजचे सरासरी आयुर्मान यांत चांगल्यापैकी लक्षणीय वाढ घडून आलेली आहे. आजचे चित्र असे आहे की, सरासरी नोकरदार व्यक्ती त्याच्या नोकरीमध्ये आयुष्याचा जितका काळ व्यतीत करते त्याच्या किमान ५५ ते ७० टक्के काळ ती निवृत्तिपश्चात हयात असते. म्हणजेच, निवृत्तिवेतनादी सुविधांचा लाभ घेण्याच्या कालावधीमध्ये, पूर्वीच्या तुलनेत आज, घसघशीत वाढ झालेली आहे. जीवनाच्या त्याच पर्वादरम्यान औषधोपचारांवरील खर्चातदेखील वाढ होत असते वा झालेली असते. परिणामी, शासनसंस्थेच्या एकंदर खर्चापैकी लक्षणीय हिस्सा वयोवृद्ध नागरिकांच्या कल्याणाकडे वळवणे सत्ताधारी सरकारांना आज क्रमप्राप्त ठरते आहे.

निवृत्तिवेतनादी सुविधा व सामाजिक सुरक्षेचे कवच ज्येष्ठांइतकेच तरुण पिढ्यांनाही हवेहवेसे वाटते. निवृत्तिवेतनाची सांगड व्यक्तीच्या पगाराशी कायमस्वरूपी जोडलेली असावी आणि त्या रकमेत महागाईच्या सरासरी दरानुसार वेळोवेळी वाढ घडत राहावी, अशी मनीषा ब्रिटन तसेच अमेरिकेतील तरूण वर्गाने अगदी अलीकडेच तिथे केल्या गेलेल्या पाहण्यांदरम्यान व्यक्त केली. लोकमताचा हा कल डावलून आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यापेक्षा विस्तारवादी, उदार असे राजकोषीय धोरण (फिस्कल पॉलिसी) राबविण्याचा सुलभ पर्याय सगळ्यांच देशांतील राजकीय व्यवस्था सरसहा अंगीकारते. त्यांतून तुटीचे भगदाड रुंदावते, कर्जबाजारीपणा वाढतो. त्यांपायी सगळेच वित्तीय समीकरण पुरते विस्कटून जाते. तूट वाढू नये यासाठी दोन उपाय हमीचे ठरतात. एक तर, सरकारी खर्चाला निर्ममपणे लगाम घालणे आणि/अथवा करदरांमध्ये वाढ घडवून आणत एकंदर करसंकलनात वाढ साध्य करणे. परंतु, इथेही राजकीय पक्षांची स्थिती, 'धरले तर चावते आणि सोडले

तर पळते,' अशी होते. कोणाही नागरिकाला करांचा त्याच्या खिशावरील वाढता भार नकोसा असतो. दुसरीकडे, सरकारी खर्चाला कात्री लावली की, सार्वजनिक सेवासुविधांचा गुणात्मक दर्जा खालावून नागरिकांमधील नाराजी वाढते. शासकीय सेवांचा दर्जा समाधानकारक नसला की संबंधित कर अदा करण्यास अथवा सेवाशुल्के चुकती करण्यास करदाते नाखूष असतात. त्याचा विपरित फटका साहजिकच बसतो करसंकलनाला. त्याचे प्रतिबिंब उमटते प्रथम सरकारी महसुलात आणि नंतर तिजोरीतील तुटीमध्ये!

या सगळ्या बाबींसंदर्भात, खरे म्हणजे, तारतम्यपूर्ण चर्चा व्यापक स्तरावर सतत घडत राहणे निकडीचे ठरते. अगदी सरकार अथवा शासनसंस्था जरी म्हणले तरी, अमर्याद साधनसामग्री वर्षानुवर्षे उभी करत राहणे हे तिलाही अशक्यप्रायच असते, हे वास्तव कितीही कटू असले तरी प्रत्येकानेच समजावून घ्यावयास हवे. राजकीय व्यवस्थेची विश्वासार्हता निरपवाद असणे ही तशा तारतम्यपूर्ण व प्रगल्भ विचारविनिमयाची अनिवार्य अशी पूर्वअट ठरते.

**या अंकातील लेखांचे संदर्भ :**


- https://whc.unesco.org/en/list/338/.
- https://www.rspnbhutan.org/wp-content/uploads/2023/10/WBH-Brochure_Digital_Original.pdf
- https://threatenedtaxa.org/index.php/JoTT/article/view/2892.
- Governments going broke, The Economist, special report : The World Economy, October 18th 2025.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे : खंड १८ : भाग ३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे : भाग ३ : १९४६-१९५६ पृष्ठ क्रमांक : २१८-२१९.
- राजकीय पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे : खंड १८ : भाग ३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे : भाग ३: १९४६-१९५६ पृष्ठ क्रमांक : १५६-१७६.

# उजळणी

१. घटनात्मक नीतीचे काटेकोर पालन करा

२. राजकीय पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.

# उजळणी

**टीपा :**

(१) त्रिवेंद्रम येथील कायदेमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण तारीख १० जून १९५० या दिवशी आयोजित करण्यात आलेले होते. सामाजिक क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांसमवेतच अनेक सरकारी अधिकारीदेखील त्या प्रसंगी उपस्थित होते. बाबासाहेबांचे ते भाषण झाले त्या वेळी संविधानाची तामिली होऊन अवघे सहा महिने उलटत होते. संविधानाच्या अंमलबजावणीचे अमृतमहोत्सवी वर्ष आता उलटून चाललेले आहे. आपण स्वीकृत केलेल्या संविधानातील तरतुदींची अंमलबजावणी काटेकोरपणे करत त्यानुसार आचरण करण्याची संविधानिक नीतीमत्ता जर पाळली गेली नाही तर संविधानातील तरतुदी केवळ कागदावरच उरतील, असा बाबासाहेबांनी त्या वेळी दिलेल्या इषाऱ्याचे स्मरण आज पुन्हा करण्याची गरज प्रकर्षाने आहे.

(२) संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेन्द्रप्रसाद यांचे समारोपाचे भाषण होऊन तारीख २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी आपल्या देशाचे संविधान संमत झाले. त्याच्या आधल्या दिवशी, म्हणजे, तारीख २५ नोव्हेंबर १९४९ या दिवशी संविधान सभेच्या अंतिम बैठकीदरम्यान समारोपाचे भाषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. मुळात, लोकसत्ताक राज्यपद्धतीचे चलनवलन जीवनव्यवहारात फारसे न रुजलेल्या आणि जातिपातींच्या उतरंडीपायी एकसंधता चिरेबंदी नसलेल्या या देशात लोकशाही राज्यपद्धती रुजण्यासाठी कोणकोणत्या मूल्यांचे स्मरण व अनुसरण अनिवार्य ठरते, या संदर्भात बाबासाहेबांनी त्यांच्या विवेचनादरम्यान पोटतिडिकेने केलेले प्रतिपादन आजही तितकेच प्रस्तुत ठरते. संविधानाच्या अंमलबजावणीचे अमृतमहोत्सवी वर्ष उलटून जात असताना, आज, म्हणूनच, बाबासाहेबांच्या त्या विवेचनरूपी आरशात आपण सगळ्यांनीच डोकवून बघण्याची नितांत गरज आहे.

## उजळणी

# १. घटनात्मक नीतीचे काटेकोर पालन करा

प्रत्यक्ष घटनेपेक्षा घटनेप्रमाणे वागण्याची नीती जनतेत असणे या गोष्टीला फार महत्त्व आहे. देशात पार्लमेंटरी लोकशाहीची पद्धत यशस्वी व्हावयाची असेल तर सरकार व जनता या उभयतांनी घटनेतील काही संकेत आणि नीती यांचे पालन करणे अवश्य आहे. हे संकेत व नीती पुढीलप्रमाणे आहे –

सरकार बनविण्याच्या पद्धतीविषयी आदर, कायद्याचे पालन, स्वतंत्र विचार करण्याची सवय व बहुसंख्यांकांच्या नियमाचे पालन.

त्याचप्रमाणे सरकारनेही पुढील गोष्टी पाळल्या पाहिजेत –

देशातील बहुसंख्य लोकांचा आपल्यावरील विश्वास उडाला आहे, असे दिसून आल्यास घटनात्मक नीतीस अनुसरून सरकारने आपल्या अधिकारपदाचा त्याग केला पाहिजे. अल्पसंख्यांकांबद्दल आदर बाळगला पाहिजे व शेवटची गोष्ट म्हणजे राज्यशासन नि:पक्षपाताने चालविले पाहिजे.

आपल्या समाजातील निरनिराळ्या लोकांची राहाणी व विचार करण्याची पात्रता या गोष्टी विचारात न घेता केवळ तात्त्विक बाजू विचारात घेऊन घटना बनविणे या गोष्टीमुळे जगातील अनेक घटना अयशस्वी ठरतात. अधिकारावर असलेल्या लोकांनी हे ध्यानात ठेवावे की, घटना करण्याचा व राज्यकारभार करण्याचा अधिकार त्यांना जो मिळालेला असतो तो काही अटींवर लोकांनीच दिलेला असतो. सरकारने चांगला राज्यकारभार करावा याच अटीवर लोकांनी त्यांना वरील अधिकार दिले असतात. त्यांना जर ही अट पुरी करता येत नसेल तर सरकारने आपली अधिकारसूत्रे खाली ठेवली पाहिजेत.

अल्पसंख्यांकांबद्दल सरकारने आदर बाळगला पाहिजे. अल्पसंख्यांकांना आपली मते मांडण्याची योग्य संधी असावी. याच पायावर पार्लमेंटरी लोकशाहीची उभारणी झालेली आहे.

त्याचप्रमाणे नि:पक्षपाती राज्यकारभार चालणे अवश्य आहे. ब्रिटिश जनता कोणत्याही राजकीय पक्षाच्या लायकीचे मोजमापन त्याच्या गुणावरून करते. म्हणून एखादा पक्ष अधिकारावर आला तर त्याचे समाधान केले पाहिजे, त्याला खूष ठेवले पाहिजे, अशा वशिलेबाजीचा तेथे प्रश्नच उपस्थित होत नाही, भारतात मात्र अधिकारावर असलेला पक्ष काही लोकांना विशेष सवलती देतो असे अनेक उदाहरणांवरून दिसून आले आहे.

जुन्या घातुक प्रवृत्तीवर मात करून क्षुद्रवृत्ती आणि जातीयता यांना थारा न देता राष्ट्रात हुकूमशाही निर्माण होणार नाही व कोणत्याही प्रकारचा छळ राष्ट्रात चालणार नाही अशी खबरदारी घेऊनच लोकांनी वागावे. लोक या मार्गे लागतील, अशी मला आशा आहे.

***

## २. राजकीय पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर स्वातंत्र्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.

संविधान सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर, १९४६ ला झाली. त्याकडे पाहाता आतापर्यंत २ वर्षे ११ महिने आणि १७ दिवसांचा कालखंड लोटलेला आहे. या कालखंडात संविधान सभेची एकूण ११ सत्रे पार पडलीत. या ११ सत्रांपैकी ६ सत्रे उद्दिष्टपूर्तीचा ठराव पारित करणे आणि मूलभूत हक्क, केन्द्रीय संविधान, केन्द्राचे अधिकार, प्रांतिक संविधान, अल्पसंख्यांक या समित्यांच्या अहवालावर आणि अनुसूचित क्षेत्रे आणि अनुसूचित जमाती यावर विचार-विनिमय करण्यासाठी खर्ची पडली. सात, आठ, नऊ, दहा आणि अकरा ही सत्रे मसुदा संविधानाच्या विचार विनिमयार्थ उपयोगात आणली गेली. संविधान सभेच्या या अकरा सत्रांचे प्रत्यक्ष कामकाजाचे १६५ दिवस होतात. त्यापैकी मसुदा संविधानाच्या विचारार्थ सभेने ११४ दिवस उपयोगात आणले.

संविधान सभेने २९ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीची निवड केली. तिची पहिली बैठक ३० ऑगस्टला झाली. ३० ऑगस्ट पासून १४१ दिवस चाललेल्या कामकाजादरम्यान ती समिती संविधान मसुदा तयार करण्याच्या कामात व्यस्त होती. संविधान सल्लागारांनी मसुदा समितीकडे कामकाजासाठी आराखडा दिला तेव्हा मसुदा संविधानात २४३ अनुच्छेद आणि १३ परिशिष्टे समाविष्ट होती. मसुदा

समितीने संविधान सभेला सादर केलेल्या पहिल्या मसुदा संविधानात ३१५ अनुच्छेद आणि ८ परिशिष्टे यांचा समावेश होता. विचार विनिमयाच्या शेवटच्या टप्यात मसुदा संविधानातील अनुच्छेदांची संख्या वाढून ३८६ झाली. तिच्या अंतीम स्वरुपात मसुदा संविधानात ३९५ अनुच्छेद आणि ८ परिशिष्टांचा समावेश आहे. मसुदा संविधानात दुरुस्ती करण्यासाठी अंदाजे ७,६३५ दुरुस्त्या सुचविण्यात आल्या. त्यापैकी २,४७३ दुरुस्त्या सभागृहात प्रत्यक्ष विचारार्थ सादर करण्यात आल्या.

मी या वस्तुस्थितीचा उल्लेख एवढ्यासाठी करतो आहे की एकावेळी असे म्हटल्या जात होते की, आपले काम पूर्ण करण्यासाठी समितीने प्रदीर्घ कालावधी घेतला आहे. ती संथपणे काम करीत आहे आणि जनतेच्या पैशाची उधळपट्टी करीत आहे. रोम जळत असताना निरो फिडल वाद्य वाजवित बसला होता अशी स्थिती असल्याचे बोलले जात होते. या आक्षेपात काही तथ्य आहे का? इतर देशातील संविधान सभांनी त्यांचे संविधान निर्माण करण्यासाठी किती काळ घेतला ते पाहू या. काही उदाहरणे घेऊ या, अमेरिकेच्या सभेची पहिली बैठक २५ मे, १७८७ ला झाली आणि चार महिन्यात म्हणजे १७ सप्टेंबर १७८७ ला तिने आपले काम पूर्ण केले. कॅनडाच्या संविधान सभेची पहिली बैठक १० ऑक्टोबर १८६४ ला झाली आणि मार्च १८६७ मध्ये संविधानाचे कायद्यात रुपांतर झाले, यासाठी २ वर्षे ५ महिन्यांचा कालावधी लागला. ऑस्ट्रेलियाच्या संविधान निर्मितीचे कामकाज मार्च १८९१ ला सुरू झाले आणि ९ जुलै १९०० ला संविधानाला कायद्याचे रुप प्राप्त झाले. त्यासाठी त्यांना ९ वर्षे लागली. दक्षिण आफ्रिकेच्या संविधान निर्मितीच्या कार्याला ऑक्टोबर १९०८ मध्ये सुरुवात झाली आणि २० सप्टेंबर १९०९ रोजी संविधानाची परिणती कायद्यात झाली, एक वर्षाच्या परिश्रमात हे घडून आले. हे खरे आहे की, अमेरिका आणि दक्षिण आफ्रिकेच्या सभेने घेतलेल्या कालावधीपेक्षा आम्ही अधिक वेळ घेतला. परंतु कॅनडाच्या संविधान सभेपेक्षा आम्ही अधिक वेळ घेतला नाही आणि ऑस्ट्रेलियाच्या सभेपेक्षा खूपच कमी वेळ घेतला आहे. कोणी किती वेळ घेतला याची तुलना करताना दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांची संविधाने आपल्यापेक्षा फारच लहान आहेत. मी सांगितल्याप्रमाणे, आपल्या संविधानात ३९५ परिच्छेद आहेत तर अमेरिकन संविधानात केवळ ७ आहेत. त्यातील पहिल्या चार अनुच्छेदांची विभागणी २१ उपविभागात झाली आहे. कॅनडाच्या संविधानात १४७, ऑस्ट्रेलियाच्या संविधानात १२८ आणि दक्षिण आफ्रिकेच्या संविधानात १५३ अनुच्छेद आहेत.

दुसरी लक्षात ठेवण्यासारखी बाब अशी की, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेच्या संविधान निर्मात्यांना संविधान दुरुस्तीच्या प्रश्नाला सामोरे जावे लागले नाही. सादर करण्यात आलेल्या स्वरूपातच त्या संमत झाल्या. दुसरीकडे आपल्या संविधान सभेला २,४७३ दुरुस्त्यांचा विचार करावा लागला. ही वस्तुस्थिती लक्षात घेता दिरंगाईचा आरोप मला बराचसा निराधार वाटतो आणि इतके कठीण काम इतक्या अल्पावधीत यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल या सभेने स्वत:चे अभिनंदन केल्यास काही वावगे होणार नाही.

संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहाणार नाही. तसेच संविधान कितीही वाईट असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहाणार नाही. संविधानाचा अंमल हा संपूर्णत: संविधानाच्या स्वरूपावर अवलंबून नसतो. संविधान हे केवळ राज्याचे काही विभाग जसे कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका निर्माण करुन देते. राज्याच्या या विभागांचे कार्य लोक आणि लोकांनी स्वत:च्या आकांक्षा आणि राजकारणासाठी साधन म्हणून निर्माण केलेले राजकीय पक्ष यावर अवलंबून राहाणार आहे. भारतातील लोक आणि त्यांचे राजकीय पक्ष कसे वागतील हे कोण सांगू शकेल? आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी ते संवैधानिक मार्गाचा अवलंब करतील की क्रांतीकारी मार्गांचा अवलंब करतील? त्यांनी क्रांतीकारी मार्गाचा अवलंब केल्यास संविधान कितीही चांगले असो, ते अयशस्वी होईल हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्त्याची गरज नाही. आणि म्हणून भारतीय लोक आणि त्यांचे राजकीय पक्ष कसे वागतील हे जाणून घेतल्याशिवाय संविधानाबाबत कोणताही निर्णय घेणे निरर्थक ठरेल.

२६ जानेवारी १९५० ला भारत एक लोकसत्ताक देश होईल तो या अर्थाने की, भारतात त्या दिवसापासून लोकांचे, लोकांनी बनविलेले आणि लोकांसाठी असलेले सरकार प्राप्त होईल. तोच विचार माझ्या मनात येतो, ह्या लोकसत्ताक संविधानाचे काय होणार? हा देश ते अबाधित ठेवण्यासाठी समर्थ राहील की पुन्हा तो ते गमावून बसेल. माझ्या मनात येणारा हा दुसरा विचार आहे आणि पहिल्याप्रमाणेच तो मला चिंतातूर करणारा आहे.

भारताला लोकशाही म्हणजे काय हे माहीत नव्हते असे नाही. एक काळ असा होता की, भारत हा गणराज्यांनी भरगच्च होता आणि जिथे कुठे राजेशाही असेलच तर ती एकतर निवडलेली किंवा सीमित असायची. त्या प्रणाली कधीही अनिर्बंध

नव्हत्या. भारताला संसद किंवा संसदीय प्रणाली माहीत नव्हती असे नाही. बौद्ध भिक्खू संघाच्या अभ्यासातून हे स्पष्ट होते की, त्यावेळी केवळ संसदच होती असे नव्हे– संघ हे दुसरे काही नसून संसदच होते तर आधुनिक काळाला परिचित असलेल्या सांसदीय कार्यप्रणालीचे सर्व नियम संघाला माहीत होते आणि त्यांचे ते पालन करीत होते. बसण्याच्या व्यवस्था, विधेयक मांडण्याचे नियम, ठराव, कामकाजासाठी आवश्यक असलेली किमान संख्या, पक्ष प्रतोदाने आदेश काढणे, मतमोजणी, मतपत्रिकेद्वारे मतदान करणे, कपात सूचना, नियमितता, न्यायव्यवस्था इत्यादिबाबत त्यांच्याजवळ नियम होते. संसदेच्या कामकाजाचे हे नियम बुद्धाने संघाच्या सभेसाठी उपयोगात आणले असले, तरी देशात त्याकाळी कार्यरत असलेल्या राजकीय विधीमंडळांच्या नियमावलीतूनच त्यांनी ते स्वीकारले असले पाहिजेत.

ही लोकसत्ताक पद्धती भारताने गमावली. पुन्हा दुसऱ्यांदा तो ती गमावणार काय? मला माहीत नाही, परंतु भारतासारख्या देशात हे सहज शक्य आहे की, लोकशाही प्रदीर्घकाळपर्यंत उपयोगात नसल्यामुळे ती अगदीच नवीन भासण्याची शक्यता आहे जिथे लोकशाहीने हुकूमशाहीला स्थान देण्याचा धोका आहे. हे सहजशक्य आहे की, नव्यानेच जन्माला आलेली लोकशाही आपले बाह्य स्वरुप सांभाळेल परंतु प्रत्यक्षात ती हुकूमशाहीला स्थान देईल. जर प्रचंड बहुमत असले तर दुसरी शक्यता वास्तवात येण्याचा मोठा धोका आहे.

केवळ बाह्य स्वरूपात नव्हे, तर प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल तर त्यासाठी आपण काय करायला हवे? माझ्या मते पहिली गोष्ट जी केलीच पाहिजे ती अशी की, आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण संवैधानिक मार्गाचीच कास धरली पाहिजे. याचा अर्थ हा की, क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णत: दूर सारला पाहिजे. याचा अर्थ कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह या मार्गांना आपण दूर ठेवले पाहिजे. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टपुर्तीसाठी संवैधानिक मार्गासारखा कोणताही मार्ग शिल्लक नव्हता त्यावेळी असंवैधानिक मार्गाचा अवलंब करण्याचे समर्थन मोठ्या प्रमाणात केले जात होते. परंतु जेव्हा संवैधानिक मार्ग उपलब्ध आहेत तेव्हा या असंवैधानिक मार्गांचे समर्थन होऊ शकत नाही. हे मार्ग इतर काही नसून अराजकतेचे व्याकरण आहे आणि जितक्या लवकर आपण त्यांना दूर सारू तेवढे ते आपल्या हिताचे होईल.

दुसरी महत्त्वाची गोष्ट, जिचे पालन केले पाहिजे ती अशी की. लोकशाहीच्या संवर्धनात आस्था असणाऱ्या सर्वांना जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधगिरीचा

इशारा लक्षात ठेवावा लागेल. त्यांच्या मते, ''लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये. तसेच त्याच्यावर इतका विश्वास ठेवू नये की जेणे करून त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उध्वस्त करण्यासाठी उपयोग करील.'' संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरूषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मर्यादा असल्या पाहिजेत. आयरीश देशभक्त डॅनियल ओ कॉनेल यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे, ''कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही, कोणतीही स्त्री स्वत:च्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही आणि कोणताही देश स्वत:च्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करू शकत नाही.'' इतर देशांच्या तुलनेत भारताला हा सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे, कारण भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही देशाच्या राजकारणात दिसणार नाही इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तीपूजा ही अध:पतन आणि अंतिमत: हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.

तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे ती अशी की, केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीत सुद्धा परिवर्तन करायलाच हवे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तो एक जीवन मार्ग आहे. जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनतत्त्वे म्हणून मान्यता देतो. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या तत्त्वांचा एका त्रयीची स्वतंत्र अंगे म्हणून विचार करता येणार नाही ते त्रयीचा एक संघ निर्माण करतात, ते या अर्थाने की, त्यापैकी एकाची दुसऱ्यापासून फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा मूळ उद्देशच पराभूत करणे होय. समतेपासून स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही, समता स्वातंत्र्यापासून वेगळी करता येत नाही. तसेच स्वातंत्र्य आणि समता ही बंधुभावापासून वेगळी करता येत नाहीत. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्व निर्माण करणे होय; स्वातंत्र्याशिवाय समता ही वैयक्तिक कर्तृत्त्वाला मारक ठरेल. बंधुत्वाशिवाय स्वातंत्र्य आणि समता स्वाभाविकरित्या अस्तित्त्वात राहाणार नाहीत, त्यांच्या

अंमलबजावणीसाठी पोलीस यंत्रणेची गरज भासेल. भारतीय समाजात दोन बाबींचा पूर्णत: अभाव आहे ही वस्तुस्थिती मान्य करुनच आपण सुरुवात केली पाहिजे. त्यापैकी एक समता आहे. सामाजिक क्षेत्रात आपला भारतीय समाज हा श्रेणीबद्ध विषमतेच्या तत्त्वावर आधारित आहे. याचा अर्थ काही लोक वरच्या स्तरावर असतात तर बाकीचे निकृष्ट अवस्थेत असतात. आर्थिक क्षेत्रात आपल्या समाजात काहींजवळ गडगंज संपत्ती आहे, तर अनेक लोक घृणास्पद दारिद्र्यात जगतात. २६ जानेवारी १९५० ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत, राजकारणात आपल्याकडे समता राहील, परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे, प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारित राहाणार आहोत. अशा परस्पर विरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहाणार आहोत? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळ समता नाकारणार आहोत? आपण जर ती अधिक काळपर्यंत नाकारत राहिलो, तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहाणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत ते या सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाहीची संरचना उध्वस्त करतील.

आपल्यात उणीव असलेली दुसरी बाब म्हणजे बंधुत्वाचे तत्त्व मान्य करणे ही होय. बंधुत्व म्हणजे काय? जर भारतीय लोक एक असतील तर सर्व भारतीयांमध्ये बंधुत्वाची समान भावना असणे हे होय. हे तत्त्व सामाजिक जीवनाला एकता आणि एकजिनसीपणा प्राप्त करुन देते. ही बाब प्राप्त करणे कठीण आहे. ती किती कठीण आहे, हे संयुक्त राष्ट्र अमेरिकेविषयी जेम्स ब्राईसने त्याच्या अमेरिकन कॉमनवेल्थ या खंडात सांगितलेल्या गोष्टीवरून कळून येईल.

ब्राईसच्याच शब्दात मी उद्धृत करू इच्छितो. ती घटना अशी–

''काही वर्षांपूर्वी अमेरिकन प्रोटेस्टंट एपिस्कोपल चर्चच्या त्रैवार्षिक अधिवेशनात त्यांच्या सामुदायिक प्रार्थनेत फेरबदल करण्याचा प्रसंग आला. प्रार्थना लहान वाक्यांची करुन त्यात सर्व लोकांसाठी असलेल्या प्रार्थनेचा समावेश करणे योग्य होईल असा विचार करण्यात आला आणि न्यु इंग्लंडच्या प्रमुख धर्मोपदेशकाने पुढील शब्द सुचविले. हे प्रभो, आमच्या राष्ट्राला आशिर्वाद दे. उत्स्फुर्तपणे ते त्या दिवशी मान्य

करण्यात आले. या वाक्यावर दुसऱ्या दिवशी पुन्हा विचार करण्यात आला. धर्मोपदेशकांव्यतिरिक्त इतर अनेकांनी राष्ट्र या शब्दावर आक्षेप घेतले. त्यांच्या मते या शब्दामुळे संपूर्ण राष्ट्राचे ऐक्य प्रत्यक्षात नसले तरी स्पष्टपणे सूचित होते. त्यामुळे, तो शब्द गाळण्यात आला आणि हे प्रभो, या संयुक्त राज्यांना आशीर्वाद दे या शब्दांचा स्वीकार करण्यात आला.''

ही घटना घडली त्यावेळी अमेरिकेतील लोकांमध्ये एकत्त्वाची भावना इतकी कमी होती की, आपण एक राष्ट्र आहोत असे अमेरिकेच्या लोकांना वाटत नव्हते. जर अमेरिकेच्या लोकांमध्ये आपण राष्ट्र आहोत ही भावना निर्माण होऊ शकली नाही तर भारतीयांनी आपण एक राष्ट्र आहोत हे समजणे किती कठीण आहे हे कळून येईल. मला ते दिवस आठवतात जेव्हा राजकारणाने प्रेरित लोकांना भारतीय लोक या शब्दाची चीड येत असे. भारतीय राष्ट्र म्हणणे ते पसंत करीत असत. मी या मताचा आहे की, आपण एक राष्ट्र आहोत यावर विश्वास ठेवणे म्हणजे जे अस्तित्वात नाही ते अस्तित्वात आहे असा समज बाळगण्यासारखे होईल. हजारो जातींमध्ये विभागलेल्या लोकांचे राष्ट्र कसे बनू शकेल? सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या अजूनही आम्ही एक राष्ट्र नाही याची आम्हाला जेवढ्या लवकर जाणीव होईल तेवढे ते आमच्या हिताचे ठरेल. त्यानंतरच एक राष्ट्र होण्याच्या गरजेचे महत्त्व आम्हाला कळेल आणि आमच्या उद्दिष्टपूर्तीसाठी कोणत्या मार्गाचा आणि उपायांचा अवलंब करावा याचा आम्ही गांभीर्याने विचार करू शकू या ध्येयाप्रत पोहोचणे अतिशय कठीण आहे, अमेरिकेतील लोकांना जेवढे कठीण होते त्याहीपेक्षा कितीतरी पटीने कठीण आहे. अमेरिकेत जातीची समस्या नाही. भारतात जाती आहेत. जाती या राष्ट्रविरोधी आहेत. पहिली गोष्ट, त्या समाजजीवनात विभागणी करतात. त्या राष्ट्रविरोधी आहेत कारण त्या जाती-जातींमध्ये मत्सर व तिरस्काराची भावना निर्माण करतात. आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल तर या सर्व अडथळ्यांवर आम्ही मात केलीच पाहिजे. राष्ट्र निर्मिती नंतरच बंधुत्व वास्तवात पाहावयास मिळेल. बंधुत्वाशिवाय असलेली समता आणि स्वातंत्र्य म्हणजे रंगाच्या वरवरच्या थरांसारखा केवळ बाह्य देखावा असेल.

आपल्यासमोर असलेल्या अवघड, जिकिरीच्या कामाबद्दल माझ्या या प्रतिक्रिया आहेत. काहींना त्या कदाचित फार आनंददायी वाटणार नाहीत. या देशात राजकीय सत्ता ही मुठभर लोकांची मक्तेदारी राहिली आहे आणि बहुतांश लोक केवळ ओझे वाहणारे प्राणीच नव्हे तर भक्ष्यस्थानी असलेले प्राणी झाले आहेत. हे कोणालाही

नाकारता येणार नाही. या मक्तेदारीने त्यांना केवळ विकासाच्या संधीपासूनच वंचित ठेवले असे नव्हे तर मानवी जीवनाचे महत्त्वही कळणार नाही इतका त्यांचा नि:पात केला आहे. हे पददलित वर्ग त्यांच्यावर होत असलेल्या हुकूमतीला कंटाळले आहेत. स्वत:च राज्य करण्यासाठी ते आतूर झाले आहेत. पददलित समाजातील लोकांमध्ये निर्माण झालेल्या या तीव्र आकांक्षा वर्गसंघर्ष आणि वर्गयुद्ध होण्याइतपत वाढू देता कामा नये. त्याचा परिणाम घर दुभंगण्यात होईल. तो निश्चितपणे विनाशकारी दिवस असेल. अब्राहम लिंकन यांनी समर्पकरित्या म्हटल्याप्रमाणे, दुभंगलेले घर अधिक काळपर्यंत टिकू शकत नाही. त्यांच्या आकांक्षांच्या पूर्तीसाठी जेवढ्या लवकर त्यांना संधी उपलब्ध करुन देता येईल तेवढे ते मूठभरांच्या हिताचे, देशाच्या हिताचे, त्याच्या स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ आणि त्याच्या लोकसत्ताक संरचना टिकून राहाण्यासाठी अधिक उपयुक्त ठरणार आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात समता आणि बंधुत्व प्रस्थापित करण्यानेच हे शक्य होणार आहे. त्यामुळेच त्यांच्यावर मी इतका भर दिला आहे.

मी सभागृहाला अधिक थकवू इच्छित नाही. स्वातंत्र्य ही आनंदाची बाब आहे याबद्दल शंका नाही. परंतु या स्वातंत्र्याने आपल्यावर फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत याचा आपण विसर पडू देता कामा नये. या स्वातंत्र्यामुळे, कोणत्याही वाईट गोष्टीसाठी आपल्याला आता इंग्रजांवर दोषारोपण करता येणार नाही. यापुढे जर काही वाईट घडले तर त्यासाठी आपल्याशिवाय इतर कुणालाही दोषी धरता येणार नाही. आहे. काळ वेगाने बदलतो आहे. मागोवा घेत आहेत. लोकांच्या अनुचित घटना घडण्याचा मोठा धोका आपले लोक सुद्धा, नवनवीन विचारप्रणालींचा राज्याचा आता त्यांना कंटाळा येवू लागला आहे. आता त्यांना लोकांसाठी राज्य हवे आहे. आणि राज्य लोकांचे व लोकांनी निवडलेले आहे किंवा नाही याची चिंता ते करणार नाहीत. ज्या संविधानात आपण लोकांचे, लोकांकरिता निवडलेले शासन या तत्त्वाचे जतन केले आहे ते जर आपल्याला सुरक्षित ठेवायचे असेल, तर आपल्या मार्गात कोणते अडथळे येणार आहेत ते आपण ओळखले पाहिजेत की जेणेकरून लोकांनी निवडून दिलेल्या सरकारच्या तुलनेत लोकांसाठी असलेल्या सरकारला लोक प्राधान्य देण्याकडे वळतील, यासाठी पुढाकार घेण्यात आपण दुर्बल ठरता कामा नये. देशाची सेवा करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. दुसरा अधिक चांगला मार्ग मला माहीत नाही.''[१]

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

## OTHER PUBLICATIONS

*Marathi Monthly:*

*ARTHABODH-PATRIKĀ*,
(Subscription Rs. 100/- per year)

*Books and Booklets:*

1. *Bhāratāteel Lok-Sankhyā Wādhichā Prashna: Santati-Niyamanāchee Jaruree Wa Tyāteel Yash,*
(The Problem of Population Growth in India: The Need for Family Planning and its Success) (in Marathi)
by Kumudini Dandekar, Pp. 60, Rs. 30/-.

2. *Compulsory Primary Education - Opportunities and Challenges,* Second Edition,
(in English and Marathi),
by Jayakumar Anagol, Pp. 54 and 61, Rs. 30/-.

3. *Shodh Ghetay Tay Shikshan,*
(To Searches is Education), (in Marathi),
by Ramesh Panse, Pp. 67, Rs. 50/-.

4. *Kartā-Karvitā, Adhunik Mendu-Sanshodhan va Aple Jeevan,*
by Ramesh Panse, Rajyashree Kshirsagar, Anita Belhekar-Deshmukh,
Pp. 242, Rs. 350/-.

5. *Governance, Supervision and Market Discipline: Lessons from Enron*
by Jayanth R. Varma, Pp. 87, Rs. 100/-.
Reprint from (*Journal of Indian School of Political Economy,*
Vol. XIV, No. 4, October-December 2002)

6. *Poverty in India,* (Reprint 2008), by V.M. Dandekar and N. Rath, Reprinted by Books for Change Bangalore, Pp. vi+140, Price Rs 200/-

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**

# वाचनीय पुस्तके

■ **Shattered Lands : Five Partitions and the Making of Modern Asia,**
**Author - Sam Dalrimple,**
**Fourth Estate, Gurugram, Haryana, 2025,**
**pp. 520, Price - Rs. 799/-**

'फाळणी' असा शब्द निव्वळ उच्चारला तरी सर्वसामान्य भारतीय नागरिकांच्या मनात स्मृती जागृत होतात त्या भारताच्या १९४७ साली झालेल्या फाळणीच्या. त्या वेळी कळत्या वयात असलेल्या पिढ्यांमधील प्रतिनिधी तेव्हाच्या आठवणींनी आजही त्या काळात मनाने लोटले जातात. परंतु, भारतीय उपखंडाचा विचार केला तर, भारताची फाळणी होण्याआधी तीन व भारताची फाळणी झाल्यानंतर एक, अशा आणखी चार फाळण्या या भूभागात आकार घेता झाल्या, हे वास्तव त्या मानाने कमालीचे अ-लक्षित आणि म्हणूनच आजही अल्पज्ञात राहत आलेले आहे. सॅम डॅल्‌रिम्पल यांचा प्रस्तुत ग्रंथ म्हणूनच अतिशय महत्त्वाचा ठरतो. ब्रिटिश अमदानीतच भारतापासून बर्मा (आजचा म्यानमार) वेगळा करण्यात आला १९३७ साली. त्या नंतर, तत्कालिन ब्रिटिश भारताच्या वेगवेगळ्या भागांत स्वायत्तता उपभोगणाऱ्या सुमारे ५५० संस्थानांची फाळणी झाली भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभा असताना. बरीचशी संस्थाने विलीन झाली भारतात. काही संस्थानांचे विलिनीकरण घडवून आणले गेले नवनिर्मित पाकिस्तानमध्ये. तर, उर्वरित थोड्या संस्थानांनी विलिनीकरणासाठी पसंती दाखवली म्यानमारची. अरबी द्वीपकल्पाचा एक मोठा भाग ब्रिटिश भारताला पूर्वापार जोडलेला होता. त्याला 'भारतीय अरेबिया' असे संबोधले जात असे. तो संपूर्ण भूभागदेखील भारतापासून अलग करण्याची ब्रिटिश अंमलाखाली सुरू झालेली प्रक्रिया पूर्णत्वास गेली ती १९७०च्या दशकामध्ये. भारताची फाळणी बेरजेत धरली की फाळण्यांची इथवर संख्या होते चार. आणि, पाकिस्तानपासून अलग निघून, १९७१ साली बांगलादेश स्वतंत्र होणे, ही ठरली आशिया खंडातील पाचवी फाळणी. म्हणजेच, एके काळी ब्रिटिश साम्राज्याचे घटकावयव असलेले भूभाग पाच फाळण्यांद्वारे अलग बनले व १२ देश नव्याने जगाच्या नकाशावर उदयाला आले. तो सारा घटनाक्रम, तपशीलवार आणि अनेकविध संदर्भस्त्रोतांसह विश्लेषक पद्धतीने कमालीच्या वाचनीय शैलीमध्ये विवरण करणारा सॅम डॅल्‌रिम्पल यांचा हा ग्रंथ केवळ इतिहासग्रंथ न राहता, गतकालाकडे बघण्याची समृद्ध अशी इतिहासदृष्टी प्रदान करणारा अव्वल दस्तऐवज ठरतो. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या प्रांतातील गुंतागुंतीच्या प्रवाह-अंत:प्रवाहांचे वर्तमानातील रंगरूप सम्यक्‌पणे आकळण्यास हातभार लावणारे असेच या ग्रंथाचे अंतरंग आहे. ■■

**RNI Regn. No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model colony Post Office Pune,**
**On 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राकिय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे – ४११ ०३०. येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**